

# सर्वांची बिलेहि चुकती केली

# माणूस

२० जुलै १९६८
चालीस पैसे

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : आठवा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर,
सौ. निर्मला पुरंदरे

---

स. न. जुलै, ११

नवा 'माणूस' वाचला. ग्यानबाचे पदार्थ अत्यंत रुचकर आहेत. शिवाय सध्या ते भरपूर मिळू शकतात. फक्त त्या मानाने खिरडी कमी मिळतात. ती जो जो अधिक मिळू लागतील तो तो राष्ट्रातली नवी पिढी बलदंड बनणे सुलभ होईल. सर्व अंकच सर्वांगसुंदर व खमंग झालेला आहे.

सु. ग. शेवडे, ठाणे

स. न. जून, ३०

'माणूस'चा नेहमीचा वाचक आहे. गेल्या सहा महिन्यांपासून 'माणूस' चे स्वरूप 'स्वस्त' होऊ लागल्याचे जाणवते. विजय तेंडुलकर यांच्या 'रातराणी' या खास सदराखेरीज 'माणूस'मध्ये फार काही नसते. आपल्या वाचकांचा दर्जा काहीतरी वरचा आहे याची सतत जाणीव ठेवावी. सध्याचे स्वरूप त्यांचे समाधान करू शकेल असे वाटत नाही.

श्रीकांत दामले, डोंबिवली

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# निर्वाणयात्रा एका वैष्णवाची


निर्वाणयात्रा एका वैष्णवाची
निर्वाणयात्रा एका वैष्णवाची
निर्वाणयात्रा एका वैष्णवाची
निर्वाणयात्रा एका वैष्णवाची
निर्वाणयात्रा एका वैष्णवाची
निर्वाणयात्रा एका वैष्णवाची











गो. नी दांडेकर

गुरुपौर्णिमेची सकाळ. टाळमृदुंगाच्या घुळघुळाटावरोबर एक धीरगंभीर निर्वाणयात्रा डॉ. फाटकांच्या रुग्णालयातून निघते. आकाश मेघांनी वोळून आले आहे. पावसाचे थेंबुटे एकट दुकट टपटपत आहेत. ही यात्रा इतर अन्त्ययात्रांसारखी नाही. त्या यात्रा केवळ शवयात्रा असतात. एकतर दुर्धर शोकाचे आवरण सर्वत्र आच्छादिलेले असते किंवा मृतासंबंधी उणेदुणे वोलू नये हा नियम मुद्दाम आठवून पाळला जातो. लटके गंभीर चेहेरे या यात्रांमधून मिरवत असतात.

पण आजची यात्रा अगदीच निराळी आहे. औपचारिकपणाचा इथे लवलेश नाही. ज्या महावैष्णवाची ही यात्रा, त्यावर हार घालायची धडपड. त्याचे दर्शन

# निर्वाणयात्रा एका वैष्णवाची

व्हावे, म्हणून व्याकुळता. कमीत कमी ज्या ट्रकवर त्याचे शरीर मांडले आहे, त्याला तरी स्पर्श करायची आतुरता. वारंवार उमळून येणारे अनिवार हुंदके — सगळे इथे अकृत्रिम आहे.

" हा शोक करून काही लाभ नसतो. निघालेला पोहोंचेपलीकडे गेलेला असतो. रडले, हुंदकले, की आपल्यालाच त्रास होतो. संध्याकाळी डोके दुखते—"

तार्किक दृष्टचा हे सगळे ठीक आहे. पण त्या तार्किक दृष्टीचा अतिरेक केला, तरी आज पुणे ढसढसा, मनमोकळे रडले, हे नाकारता कसे येईल ?

कुणासाठी हे दुःख ? एवढा अनिर्बंध शोक कुणाकरिता ?

¤

वर्षे झाली तीस किंवा एकतीस. आळंदीच्या यात्रेचा प्रसंग. श्रोते सगळे अतिरथी महारथी आहेत. पट्टीचे प्रवचनकार. विद्वान. विरक्त. त्यागी. भगवद्भक्त अशा निवडक श्रोतृसमहापुढं प्रवचनासाठी बसले आहेत सोनूमामा. श्लोक निवडला आहे पाचव्या अध्यायातला—

**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः**
**सर्वभुतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ।।**

त्या वेळी सोनूमामा स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य होते. कॉलेजमधील राजकारणात, तिथल्या सूक्तासूक्त व्यापात त्यांना निरुपायाने भाग घ्यावा लागे. भवताली तरुण—तरुणींचा समुदाय फुलपाखरासारखा या त्या फुलावर क्षण तिष्ठत वावरत असे. आम्हांला असे वाटे, की या सर्व व्यापात रात्रंदिवस राहूनदेखील मनुष्य निर्लिप्त असू शकतो ?

सोनूमामांकडून उत्तर त्या दिवशी मिळाले. ओव्या होत्या—

**जेणे भ्रांतीपासोनि हिरतले। गुरुवाक्ये मन धुतले। मग आत्मस्वरूपीं घातले। हारौनिया ।। . आतां कर्ताकर्म आधवें। हें खुंटले तया स्वभावें। आणि भरी जरी आघवे। तरी अकर्ता तो ।।**

सोनूमामांचा स्वर ते दिवशी असा काही प्रत्ययकारी होता ! ते जणू या लोकीचे बोलतच नाहीत. गुरुगम्य खूण सांगताहेत. कळेल त्याने कळवून घ्यावी. उमजेल त्याने उमजावे, आणि तृप्त व्हावे. नाना व्यापारांमध्ये गुंतलेला दिसला, तरी जळांतील पद्मपत्राप्रमाण तो साधू अलिप्त असतो, त्या कष्मळाचा बाध त्याला पोचत नाही, हे त्यांनी इतक्या निकराने सांगितले, की जणू काय ते स्वतःचेच आहे. स्वतःचा गुरुगम्य अनुभवच आहे तो. तो स्वर, ती तन्द्रा, तो आविर्भाव— हे

सगळे पाहून आम्ही सगळे श्रोते केवळ थरारून गलो ! त्या दिवशीचे प्रवचन विसरणे अशक्यच आहे !

¤

यात्रा श्रीरामकृष्णाश्रमात आली आहे. विरक्तांचे हे माहेर. चिंतकांचे, ध्यानमग्नांचे हे आवडते स्थान. सोनूमामा इथे राहत. अलिकडे त्यांनी गावात राहणे टाकले होते. इथे माणसे जमली ती सगळी वेचक आहेत. शोकाने भिजून गेलेल्या स्त्री-पुरुषांच्या मुद्रांमध्ये जतच्या राजमातांची शोकमग्न मुद्रा विसरता येणे कठीण आहे. कोणी अस्फुटपणे आक्रोश करून मला म्हणताहेत–

" अहो ! तुम्ही साधलेत ! एकादशीला, परवाच मामांच्या हाताने माळ घालून घेतलीत. सावकाश घालू, असे म्हणता म्हणता आम्ही मात्र फसलो ! आता कुठे हो शोधायचे त्यांना ? "

क्षणभराने यात्रा इथून परत फिरली आहे. आसवे ढाळीत, हुंदके देत असलेल्या स्त्री-पुरुषांच्या जमावातून ती सोनुमामांच्या कर्मभूमीकडे निघाली आहे.

मुद्दाम उल्लेख अशासाठी, की एरवी हर्षशोकाचे असे प्रगट प्रदर्शन करणे ज्यांना आवडत नाही, अशा ' रॅशनल, सोफेस्टिकेटेड ' शिक्षितांच्या वस्तीतून यात्रा चालली आहे, तरी स्त्री-पुरुष वस्त्रांनी तांबडीलाल तोंडे झाकून घेऊन रडताहेत–

¤

सोनूमामा वै. जोगमहाराजांचे अनुगत. जोगमहाराजांना कुणी विचारले, की लोकमान्यांप्रमाणे तुम्ही कारागृहात का जात नाही ? यावर ते उत्तरले होते, की आम्ही कामे वाटून घेतली आहेत. राजकीय जागरण लोकमान्यांकडे. धार्मिक उत्थान आम्हांकडे.

आळंदीहून भागानगर सत्याग्रहांत भाग घेण्यासाठी आम्ही दोघे–तिघे निघालो. सोनूमामांनी मुद्दाम संस्थेत सभा घेतली. माउलीच्या समाधीवरचे हार आणून आमच्या गळयांत घातले. त्या वेळी ते बोलले, ते इतके मार्मिक होते–

" डोळयांना तत्त्वज्ञानाच्या झडपा बांधल्याने अंगी वारकरीपणा येत नाही. कुणाला काय साधेल, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. उगीच आगीत उडी कशाला घ्या, असे जे म्हटले जाते, ती केवळ पळवाट आहे. ज्याला जमेल त्याने अन्यायाचा प्रतिकारही तीव्रतेने केला पाहिजे. तुम्ही सत्याग्रहासाठी निघालात, तिथेही वारकरीपण विसरू नका, एवढीच सूचना ! "

¤

स. प. महाविद्यालय हो बुद्धिवंतांची कर्मभूमी. सकलशास्त्रांतले प्रवीण आपल्या निवृत्त प्राचार्यांच्या दर्शनासाठी इथे जमले आहेत. एरवीच्या या सर्वांच्या प्रसन्न टवटवीत मुद्रा आज कोमाइल्या आहेत. जग उगवत्या सूर्याचे उपासक म्हटले जाते, आणि सोनमामांचा या महाविद्यालयाशी असलेला संबंध संपून उणे पुरे एक तप झाले आहे. तरीदेखील हे सगळे ज्ञानाचे साधक म्लान झाले आहेत. खिडक्यांतून, गजांआडून, गॅलऱ्यांतून–जिथून या समाधिस्थ महापुरुषाची मुद्रा दिसू शकेल, तिथून

ती पाहायला धडपडताहेत. वाकून झुकून नमस्कार करताहेत. जन हो ! एकदा शेवटचे पाहून घ्या. हा ' द लास्ट रोमन ' आहे. ¤

सोनूमामा आळंदीला आले, की संस्थेतील एका लहानश्या खोलीत त्यांचा मुक्काम असे. आम्ही सगळे विद्यार्थी त्या खोलीला वाघाची गुहा म्हणत असू. खऱ्या वाघाच्या गुहेत जाऊन त्याच्या मिशा उपटून आणणे एकापरते सोपे, पण सोनूमामांसमोर जाऊन एखादे वाक्य बोलणे महाकर्मकठीण ! त्या भास्करासारख्या तेजस्वी पुरुषासमोर उभे राहताना दृष्टी दिपूनच जायची. जे काय बोलायचे असेल, ते अनेकदा मनात घटवून, मगच पृच्छक त्यांच्या पुढे उभा ठाकत असे.

मी ठरवले, की इथले ज्ञानेश्वरी आदी ग्रंथांचे अध्ययन संपले, की धुळ्यास म. म. वेदान्तवागीश श्रीधरशास्त्री पाठकांकडे जाऊन तिथे प्रस्थानत्रयी म्हणायची. पण हे जुळायचे कसे? मजसारख्या भणंगाला शास्त्रीबुवा समोर तरी उभे राहू देतील का?

कुणी म्हणाले, की सोनूमामांनी शास्त्रीबुवांजवळच वेदांत म्हटला आहे. तेव्हा त्यांचेच पत्र घ्यावे, की झाले. पण सोनूमामांजवळ शब्द काढायचा कसा ?

शेवटी निश्चय केला, की झाले तर याच क्षणी. एरवी कधीही नाही. सोनूमामा एकादशीनिमित्त आळंदीस आले होते. निर्धार करून खोलीत गेलो. दर्शन घेतले, अन् नेहमीचा लगेच बाहेर पडण्याचा रिवाज मोडून कोपऱ्यात उभा राहिलो. आपले मोठाले डोळे मजवर रोखीत सोनूमामांनी विचारले,

" काय आहे ?"

मोजक्या शब्दात काम सांगितले. वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनी याच शिक्षणावर भरवसून स्वस्थ राहू नये, आपला अभ्यास वाढवावा, असे त्यांना फार वाटे. ऐकता क्षणी त्यांची नेहमीची गंभीर मुद्रा सौम्य झाली. ते म्हणाले,

" त्यांच्याजवळ अध्ययन करताना जेवणाचे काय करशील ?"

मी तत्क्षणी उत्तर दिले,

" माधुकरी मागेन. माझा अणुमात्र भार त्यांच्यावर पडू देणार नाही. तुमचे पत्र घेऊन त्यांच्याकडे जातो आहे, हे कधीच विसरणार नाही !"

अन् मग धडाधडा दरवाजे मोकळे झाले. सोनूमामांनी पत्र दिले. धुळ्यापर्यंतच्या भाड्याची व्यवस्था केली. आठवते की आळंदीहून धुळ्यास जाताना पुण्यात मुक्काम होता, तेव्हा जेवायलाही सोनूमामांकडेच होतो. कारण ? त्यांनी शास्त्रीबुवांना दिलेल्या पत्रात माझा उल्लेख " आमच्या संस्थेचा विद्यार्थी " असा केला होता ! ¤

स. प. मधून दो बाजूंच्या अपार दर्शनोत्सुकांमधून कशीबशी वाट काढीत ही दिंडी प्रसादकार्यालयाकडे सरते. अनेक थरथरते वृद्ध हात डोळ्यात न थांबणारी आसवे अन् हातात पुष्पमाला घेऊन ट्रकची वाट पाहताहेत. तो समोर येताक्षणी आपण आपल्या हातांनी त्या महापुरुषाच्या गळ्यात ही श्रद्धामाला घालू, हा हेत

मनी जागतो आहे. ट्रकबरोबर धावणारे स्वयंसेवक दक्षतापूर्वक हा त्यांचा हेत पुरवताहेत. आवर्जून त्या म्हाताऱ्याकोताऱ्यांना ते ट्रकजवळ आणतात, अन् त्यांना सोनूमामांचे दर्शन घडवतात. ज्याचे त्याला दिले पाहिजे. पोलिसांनी ठेवलेली व्यवस्था अगदी चोख आहे. कुठे उणे काढायला एवढासाही वाव नाही. ¤

त्यानंतर बहुत वर्षांनी भेटीचा योग आला. मधेमधे मी जे मलेबुरे करीत लिहीत होतो, ते त्यांच्या कानी येतच असले पाहिजे. अधूनमधून वृत्तपत्रांमधून ते वाचीत असले पाहिजेत.

ज्ञानेश्वर माउलीचे लहानसे चरित्र लिहिले, अन् ते त्यांच्या हस्ते प्रकाशित केले देहूला. पुस्तक अगोदरच त्यांच्या हाती पडेलशी व्यवस्था केली होती. ते इटुकले पुस्तक मामांच्या मनास आले पाहिजे. कारण " जे भक्तचरित्राते प्रशंसिती, ते मज प्राणापरीते आवडती " या माउलीच्या ओवीवर त्यांनी अगदी भरघोस प्रवचन केले. मला अगदी बरे वाटले.

त्यानंतर आजारीपणामुळे त्यांची कुठे गाठच पडेना. भावार्थ ज्ञानेश्वरी लिहिली, ती प्रकाशित झाली. दचका एकच होता—मामांना हे पुस्तक आवडेल की नाही ! शेवटी त्यांची भेट झाली आळंदीस. नमस्कार केला, अन् पिशवीतून पुस्तक काढून त्यावर त्यांचे नाव लिहू लागलो. तो ते म्हणाले –

" हूं हूं ! माझे नाव लिहू नकोस ! "

हादरलोच, म्हटले की काही चुकले असणार, आणि आता मामा यथेष्ट रागेजणार ! तोच स्मित करीत मामा बोलले,

" अरे, ज्ञानेश्वर माउलीसंबंधी काही तू लिहिले आहेस, हे ऐकल्यावर माझ्याच्याने इतके दिवस कळ निघेलच कशी ? ज्या दिवशी तुझे पुस्तक प्रकाशित झाले, त्याच दिवशी मी ते मिळविले. अगदी तुझ्या सहीसुद्धा ! हे बघ. खूप चांगले केलेस बाबा ! "

मला अगदी कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. या कृतकृत्यतेने पुढे कळस गाठला. स्वतः मामाच एके दिवशी म्हणाले,

" एका गृहस्थाचे मला पत्र आले. '—साधा सोपा, सरळ, सरस असा ज्ञानेश्वरीचा अर्थ मला हवा आहे. कुठले पुस्तक वाचू ? ' मी त्याला काय सुचविले असेल ? "

मी म्हटले,

" तुमची सार्थ ज्ञानेश्वरी ?"

" नव्हे, तुझी भावार्थ ज्ञानेश्वरी ! " ¤

मामांसारख्या विरक्त पुरुषावर पुण्याने—महाराष्ट्राने—किती आणि कसे प्रेम केले, ते आज ध्यानी येते आहे. केवळ वारकरी महाराष्ट्र ? नव्हे. केवळ हिंदुसमाज ? नव्हे. हिंदू—मुसलमान—ख्रिश्चन—पारशी—शीख—सगळ्यांचे डोळे या महावैष्णवाची

निर्वाणयात्रा दिसताच भरून येताहेत. एका पन्थाच्या आचार्यावर सर्वांनी हे असे निर्विशेष प्रेम केल्याचे उदाहरण आता पुनः कुठे आढळेल ?

यात सगळ्या दर्जाचे लोक आहेत. सगळ्या पेशांचे. सौ. मुक्ताबाई दीक्षितां-सारख्या विद्याविभूषितेपासून कौसल्याबाई कोपरगावकरणीपर्यंत. गणपतराव नलावड्यांसारखा ताठर वीराग्रणी मराठा आज एखाद्या मुलासारखा आक्रंदतो आहे !

दुतर्फाच्या माड्यांमधून, गॅलऱ्यांमधून, गच्च्यांमधून बुक्का-गुलाल-अष्टगंध यांच्या-सह फुलांची वृष्टी होत्ये आहे—अगदी सोसवेना इतकी. पुणे या महान् साधुपुरुषाला अशा रीतीने निरोप देते आहे. बिदा करते आहे. ◻

वारकरी सांप्रदायिकांनी आपल्या भवती किती मर्यादा घालून घ्याव्यात ? " आमच्या फडावर ' विठोबा रखुमाई ' हेच भजन चालते. दुसऱ्या भजनाची इथे पद्धत नाही ! " " आमच्या कीर्तनात फक्त भानुदास एकनाथांचीच प्रमाणे वापरा-यची. दुसऱ्यांची प्रमाणे देणे निषिद्ध आहे ! " मामा खन्तावून म्हणत,

" आता या दुराग्रहाला काय म्हणावे ? जोगमहाराजांनी हे कधीच मानले नाही. त्यांनी अवघ्या सन्तांचा आदर केला. अगदी समर्थ रामदासांचा देखील. "

एरवी वारकरी—धारकरी यांच्यांत उभा दावा. अगदी डोकी फुटाफुटीपर्यंत पाळी. पण कै. जोगमहाराजांनी या बांधावर पहिली कुदळ घातली, अन् सोनूमामांनी आपल्या भजनांकीर्तनांत समर्थांच्या ओव्यांचा—अभंगांचा प्रसार प्रचार करून हे भेदांचे दुर्ग अगदी नेस्तनाबूत करून टाकले. कितीएकदा दासनवमीच्या उत्सवात किती ठिकाणी मामांची प्रवचने झाली. केवळ समर्थच नव्हे, तर प्लेटो-सॉक्रेटिस-सारख्या पाश्चात्य विद्वानांच्या विषयीही त्यांच्या मनी अतोनात आदर. म्हणूनच हा एवढा प्रचण्ड लोकसंग्रह ते करू शकले ! ◻

अन्त्ययात्रा पुणे सोडून बाहेर निघाली आहे. जवळजवळ आठ ते दहा हजार भावमग्न स्त्रीपुरुष कोसळत्या पावसात भिजत मुखाने हरिनामाचा गजर करीत आळंदीकडे चालले आहेत. होळकर पुलापलीकडे मिलीटरी हद्दीत प्रवेश होताच एक विस्मयकारक दृश्य दिसते.

लष्करी वेष ल्यालेले किती मराठे—किती महार—किती शीख हा ट्रक समोर येताच खाडकन् बूट वाजवून अटेन्शन् करतात अन् मग हात अगदी खेचून सॅल्यूट ! ट्रक नजरेआड होईपर्यंत कपाळापासला हात ते ढळवीत नाहीत. ◻

प्रत्येक विषयात मलाच काय ते बहुत बहुत कळते, या दुराग्रहापासून सोनूमामा शेकडो कोस दूर होते. जो ज्या विषयातला जाणकार, त्याचे मत त्या विषयात ते ग्राह्य मानीत. तिथे कुणाची लुडबुड ते चालू देत नसत.

वै. जोगमहाराजांचे चरित्र छापताना याचा फार नेटका प्रत्यय आला. प्रश्न

होता, की चरित्राची छपाई कुठे व्हावी. वारकरी वाङमय छापणारी काही मुद्रणालये त्यांच्या समोर होती. पण त्यांना भरवसा देऊन कल्पना मुद्रणालयाचे नाव सांगितले, आणि त्यांनी निर्णय घेऊन टाकला. पुढे कुणी शंका घेतली असता ते ताडदिशी म्हणाले,

" छपाईतले तुम्हांला जास्त कळते की गोपाळला ? त्याची कितीक पुस्तके तिथे छापली आहेत. तेव्हा या बाबतीत तो म्हणतो ते खरे !"

आणि शेवटी जेव्हा पुस्तकाची सुबक छपाई झालेली त्यांनी पाहिली, तेव्हा प्रसन्नपणे ते म्हणाले,

" इतके चांगले पुस्तक ! हाती उचलून त्याचा वाससुद्धा घ्यावासा वाटतो !" अन् शेवटच्या क्षणी हे पुस्तक त्यांच्या उशाशी होते ! ¤

या वैशाख वद्य दशमीला तळेगावी कीर्तनासाठी यायचे त्यांनी केव्हापासून कबूल करून ठेवले होते. चार–दोन वेळा पत्रापत्री होऊन सगळा कार्यक्रम निश्चित ठरला होता. अगदी शेवटच्या पत्रात त्यांनी लिहिले होते–

" माझ्यासाठी गाडी पाठवायची गरज नाही. मी कुणाची तरी गाडी इकडूनच घेऊन येईन. मजबरोबर आळंदीचे दोघे विद्यार्थी आणि ह. भ. गोपाळराव रिसबूड असतील. कीर्तन उरकून मुक्कामासाठी मी आळंदीस जाईन–"

असे सगळे पक्के झाले होते, आणि घडले मात्र नाही. तळेगावी येण्यासाठी ते घाईघाईने पंढरपूरहून पुण्यास आले, आणि त्यांची प्रकृती बिघडली. मी त्यांना घेऊन येण्यासाठी पुण्यास गेलो असता म्लान वदनाने ते म्हणाले,

" अरे, कबूल केले होते खरे, पण प्रकृती ही अशी ! त्यातही सायंकाळपर्यंत मला नुसते बरेही वाटले, तर येतो. "

ते घडायचे नव्हते. प्रकृती तशीच राहिली. त्यानंतर ते आळंदीस गेले. पंधरावीस दिवसांनी मूत्राशयाचे दुखणे होऊन ते रुग्णालयात दाखल झाले.

मी रुग्णालयात दाखल होताच ते बोलले,

" अरे ! तुझ्या गावी यायचे राहून गेले हा ! आता बरा झाल्यावर येईन !"

मी म्हटले,

" मामा, आता तुम्ही रुग्णालयातून सुटी मिळाल्यावर कुठेतरी चार महिने विश्रांति घ्या. तळेगावी येण्याचे पुढे पाहता येईल. "

किंचित् हसून ते बोलले,

" या डॉक्टरांची मौज बघ. प्रत्येक एकेका विषयातला तज्ज्ञ. मात्र दुसऱ्या विषयातले त्याला विचारायला जा, तो कानांवर हात ठेवणार ! आता माझी लघवी तुंबली आहे, आणि हृदय कमजोर आहे. या दोन विषयांचे दोन स्पेशालिस्ट याला त्यातले कळत नाही, त्याला यातले ! आणखी एक–सगळे शरीराच्या बाह्यांगाची चिकित्सा करताहेत. मात्र याच्या आत जो साक्षी बसला आहे, त्याच्याकडे

लक्ष द्यायला कुणाजवळच वेळ नाही. तलावाचा धनी म्हणतो, माझा तलाव. तलावातल्या मासोळ्या म्हणतात, आमचा तलाव ! अशी मौज आहे झाले !"

मामांनी अधिक बोलणे त्यांच्या परिस्थितीला मानवणारे नव्हते, म्हणून मी निघायची घाई करू लागलो. तेव्हा पुन्हा मला हाक मारून ते म्हणाले,

"ऐकलेस रे ! अरे, माउली आणि शंकराचार्य या दोघांमध्ये तसा वादाचा मुद्दा कसलाच नाही. आचार्यांनी काही मायेला भावरूपत्व दिले नव्हते. "का अविद्या" या प्रश्नाचे उत्तर त्यांनी "यस्य दृश्यते तस्य" असे निसटते दिले. आचार्यांच्या प्रशिष्यांनी मात्र मायेला भावरूपत्व दिले. माउली अनुभवामृतामध्ये "विखुरली आले वाचेचिये" म्हणाले आहेत, ते या प्रशिष्यांना !"

मला अतिशय नवल वाटले. वस्तुतः या क्षणी मामांचा एक पाय तळ्यात होता, अन् एक मळ्यात. मृत्यूशी शिवाशिवीच चालली होती, मात्र चिंतन चालले होते, ते शरीराचे ? नव्हे. आळंदीच्या वारकरी संस्थेचे ? नव्हे. प्रपंच मांडलाच नसल्यामुळे प्रपंचाचेही नव्हे. तर जन्मभर ज्या परमार्थाचे चिंतन मनन ते करीत होते, त्याच चिंतनामध्ये ते गढून गेले होते—शेवटील क्षणांमध्ये देखील ! ◻

पुणे आळंदी रस्त्यावर खूप चिखल झाला आहे.

पाऊस कोसळतोच आहे.

तरी या कशाचीच तमा न बाळगता आपल्या या अतिशय आवडत्या तत्त्ववेत्त्याबरोबर हजारो स्त्री-पुरुष आळंदीची वाटचाल करीत आहेत.

ही अशी आळंदीची वारी पुनः घडायची नाही. असल्या महाभागवताबरोबर पुनः या वाटेने जायला मिळायचे नाही. ◻

आपल्या आचार्यांचे ऋण मामांनी फेडले. त्यानिमित्त झालेली —

सर्वांची बिलेही चुकती केली.

असा हा अवघ्यामधून मोकळा झालेला महापुरुष आपल्या गुरुमाउलीच्या शेजारी विसावायला निघाला आहे. आता ऐसे कोणी होणे नाही ! आता ऐसे कुणा दिसणे नाही. तेव्हा रेंगाळू नका. हा क्षण साधला पाहिजे. ○

स. न. फेब्रु, २२

नेवासा व शेवगाव करून काल येथे आलो. आपणांस पुढील गोष्ट सांगायचे विसरलो म्हणून हे पत्र देत आहे. गुरुवर्यांच्या चरित्राच्या काही प्रती आपल्या स्नेही मंडळींना भेट म्हणून देणे असल्यास मला कळवावे. मी त्यापूर्वी सौ. मीराबाईकडे पोचत्या करीन म्हणजे आपणांस मिळतील. छापखान्यातून सर्व प्रती आश्रमात आल्या. सर्वांची बिलेही चुकती केली. —शं. वा. दांडेकर

**श्री. गो. नी. दांडकर यांना कै. सोनोपंत दांडेकर यांचे आलेले पत्र.**

सत्यजित राय यांनी एकदाच 'पथेर पांचाली' नामक एक दृष्ट लागण्याइतका सुरेख चित्रपट निर्माण केला. त्यानंतर त्याच कथानकाच्या पुढील भागांवर 'अपराजितो' आणि 'ओपूर संसार' हे आणखी दोन चित्रपट त्यांनी काढले. तेही आपापल्या शैलीने प्रभावी आणि संस्मरणीय असेच होते; तरी पण सत्यजित यांच्या अनेक निस्सीम चाहत्यांना रुखरुख लागून राहिली की 'पथेर पांचाली'ची सर काही त्यांना नाही. त्यानंतर आपल्या या चाहत्यांची रुखरुख कायम ठेवावी असा जणू विडाच या प्रतिभाशाली दिग्दर्शकाने उचलला काय न कळे पण 'पथेर पांचाली'शी दूरान्वयानेही तोलता येणार नाहीत असे अनेक लहान मोठे चित्रपट त्यानी तयार केले. या प्रत्येक चित्रपटात त्यांचे चित्रपटाच्या माध्यमावरचे प्रभुत्व निर्विवादपण जाणवत होते; पण 'पथेर पांचाली' तो 'पथेर पांचाली.' ते मुळी एक दृश्यकाव्यच होते. त्याच्या विषयाचा विलक्षण आवाका आणि खोली नंतरच्या चित्रपटांना काही आली नाही. सत्यजित म्हणजे 'पथेर पांचाली' हे समीकरण कायम राहिले.



कनिका मुजुमदार

सत्यजित यांचा नवा चित्रपट 'चिडियाघर' हे समीकरण पुन्हा एकदा, कधी नव्हे एवढे जोराने सिद्ध करण्याइतका बंडल आहे.

कथा अशी आहे. निशानाथ सेन हे निवृत्त सेशन्स जज्ज आणि विक्षिप्त वृत्तीचे गृहस्थ होते. कलकत्त्याच्या आसमंतात कुठेतरी गोलप-कॉलनी म्हणून एक छोटी वसाहत त्यांनी स्थापन केली होती. झाडे आणि म्हशी जोपासणाऱ्या या वसाहतीत, ज्यांना जगात कोणत्या ना कोणत्या कारणाने थारा उरला नव्हता अशी काही माणसे निशानाथ यांनी राहू दिली होती. यात एक डॉक्टर भुजंगदास म्हणून डॉक्टर होता. गर्भपाताच्या बेकायदा शस्त्रक्रिया करण्याबद्दल याचा वैद्यकीचा परवाना रद्द करण्यात आलेला होता. सतार वाजवण्याचा याला छंद होता. दुसरे

रातराणी

□

विजय तेंडुलकर

□

# चिडियाखाना

ज्याने कितीएक बेभान आणि सुंदर क्षण दिले आणि अजूनही जो असे असंख्य क्षण देईल इतका उमेदीत आहे त्याचे एखादे असे दारुण अपयशदेखील कृतज्ञतेपोटी सुसह्य मानले पाहिजे......

होते रसायनशास्त्राचे प्राध्यापक नेपल गुप्ता, यांनी स्फोटक द्रव्ये बनविण्याचा उद्योग आरंभल्याने यांची प्राध्यापकी कायमची संपली होती. तिसरा गुन्हेगार म्हणून तुरुंगवास भोगून वैष्णवपंथी बनलेला ब्रोइओदास. कारखान्यातील अपघातात हात कामी आलेला रसिकलाल चौथा. पाचवा, वहिरामुका पनुगोपाल. सहावा, बेफाम मोटर हाकण्याबद्दल लायसन्स जप्त झालेला ड्रायव्हर मुष्किल. याशिवाय मुष्किलची तरुण पत्नी नझर बिबी, परिस्थीतीने वेश्याव्यवसाय करावा लागलेली आणि तो सोडून वसाहतीत येऊन राहिलेली बनलक्ष्मी आणि प्राध्यापक गुप्ता यांची कन्या मुकुल अशा तीन स्त्रिया या वसाहतीत आश्रयार्थी म्हणून राहत होत्या. या तिघींशिवाय आणखी एक तरुण स्त्री तिथे होती. वसाहतीचे वयस्क धनी निशानाथ यांची ही पत्नी दमयंती. निशानाथ यांचा एक तरुण पुतण्याही तिथे असे; याचे नाव विजयकुमार.

अशी ही गोलप कॉलनी नामक वसाहत.

चित्रपटाच्या आरंभी वसाहतीचे संस्थापक आणि संचालक निशानाथ खासगी डिटेक्टिव्ह व्योमकेश बक्षी याच्याकडे एका पावसाळी रामप्रहरी येऊन प्रविष्ट होतात. त्यांच्या वसाहतीप्रमाणेच त्यांचे व्यक्तिमत्त्व रहस्यमय आहे. त्यांच्या काळचा चष्म्याच्या भिगात बाहेरच्या प्रकाशाची प्रतिबिंबेच काय ती दिसतात.त्यांना पाहिले कीच पटते की या माणसाचे काहीच चारचौघांसारखे नाही. ते, तरुण व्योमकेश आणि त्याचा ' डॉ. वाट्सन ' (शेरलॉक होम्स या इंग्रजी साहित्यातील विख्यात डिटेक्टिव्हचा सहकारी या नावाचा होता; ) अशा दोघांना एक कामगिरी सांगतात. एका जवाहिऱ्याच्या खूनप्रकरणी पोलिसांना अनेक वर्षांपासून हवी असलेली जुनी चित्रपटतारका सुनयना वसाहतीतच नाव आणि व्यक्तिमत्त्व बदलून राहत आहे किंवा काय याचा शोध त्याने घ्यावा. हाडांचा सांगाडा, विखारी सर्प अशा अनेक

भयावह गोष्टींची संगत करून गुन्ह्यांचा छडा लावणारा व्योमकेश ही कामगिरी पत्करतो आणि प्रथम, ही सुनयना होती तरी कशी यासाठी चित्रपटसृष्टीचे ओपासून ठोपर्यंत ज्ञान असलेले रंगेल धनाढ्य गृहस्थ रामेन मल्लिक यांना गाठतो. तिच्या जुन्या चित्रपटातले तिच्या भूमिकेचे तुकडे अभ्यासतो आणि जपानी शेती-तज्ज्ञाच्या सोंगात जपानी शैलीने पाय ओढीत तुरुतुरु गोलप कॉलनीत जातो. तिथे सर्वांच्या भेटी घेतो, प्रत्येकाला विचारतो, ' फोतो ?' सर्वांची छायाचित्रे काढतो. त्याच दिवशी संध्याकाळी निशानाथ यांचा भयंकर खून घडतो. तोही, डिटेक्टिव्ह व्योमकेश याला काही महत्त्वपूर्ण गुप्त माहिती देण्यासाठी निशानाथ व्योमकेश याला फोन करीत असता ! या खुनाच्या धागेदोऱ्यांमागे व्योमकेश आणि पोलिस असता दुसरा खून घडतो. प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे होते.

व्योमकेश गुन्हेगाराचा आणि भूतपूर्व चित्रतारका सुनयनाचा तपास लावण्यात अखेर यशस्वी होतो; पण दरम्यानचा या गुंतागुंतीच्या रहस्य–कथेचा उलगडा फार संथगती आणि विशेष तंग क्षण निर्माण न करता होत रहातो आणि रहस्याच्या उकलीइतकीच, किंबहुना अधिकच, चित्रपटाच्या अखेरीविषयी उत्कंठा लागते.

हे कथानकच घटनाप्रधान नसून व्यक्तिरेखाप्रधान आहे. (इथे ॲगाथा ख्रिस्तीच्या ' माउसट्रॅप ' या इंग्लंडमधील रंगभूमीवर वर्षानुवर्षे चाललेल्या व्यक्तिरेखाप्रधान नाटकाची सहजच आठवण होते; ) त्यातल्या रहस्याचे दुवे वर्तमानापेक्षा भूतकालात अधिक गुंतले आहेत. आणि ज्या शैलीने सत्यजितनी या कथेची पटकथा लिहिली आहे या शैलीतही या चित्रपटाच्या संथ व शब्दबंबाळ जातीची बीजे आहेत. एखादे कोडे सोडवावे तशा पद्धतशीर, तर्कशुद्ध रीतीने या चित्रपटातले रहस्य त्यांनी सोडवीत नेले आहे. त्यात प्रेक्षकाला धक्के देणारे, झुलवणारे, श्वास रोधून धरण्याला लावणारे, त्याचा एका हिशेबाने अध्येमध्ये बुद्धिभेद करून पुन्हा त्याला योग्य वळणावर आणून सोडणारे रोमहर्षक अतिरिक्त नाटच एकंदरीने कमीच आहे. या बाबतीत अमेरिकन निर्माते-दिग्दर्शक फार हुशार ! आपले यशस्वी रहस्यपट त्याच मंडळीने तयार केलेली वाट निष्ठेने चोखाळून यशस्वी होतात. तुलनेने जपानी रहस्यपट आणि एकंदरीने जपानी चित्रपटच गतीने संथ. त्यात शब्दही कमी. सत्यजित यांचा हा ' चिडिया घर ' गतीच्या बाबतीत जपानी चित्रपटाचे स्मरण देतो. पण त्यात जपानी चित्रपटाच्या तुलनेने संवाद बरेच अधिक आहेत. अतिरेकी नाट्याचा सत्यजित यांचा पिंडच नाही. एखादा सामाजिक आशयाचा साधा पण प्रभावी चित्रपट वस्तुनिष्ठ चित्रणाने तयार करावा तसा हा रहस्यपट त्यांनी तयार केला आहे, म्हणा ना. तेच छायाचित्रणाचे तंत्र त्यांनी एखाद दुसऱ्या प्रसंगाच्या फरकाने इथेही वापरले आहे. परंतु त्यांच्या एरवीच्या चित्रपटाला या तंत्राने जी खोली प्राप्त होते ती इथे आवश्यक नव्हती आणि कथेच्या आडातच ती नसल्याने तन्त्राच्या पोहऱ्यातही ती आलेली नाही. परिणामी एक

फिका रहस्यपट या श्रेष्ठ दिग्दर्शकाने निर्माण केला आहे. आणि 'चिडियाघर' हे उगीच जीवनाविषयी काही भाष्य सूचित करणारे नाव त्याला दिले आहे.

एखाद्या प्रतिभावान दिग्दर्शकाने आपली एकच लोकोत्तर कलाकृती पुनःपुन्हा निर्माण करावी असे कोणीही म्हणणार नाही. यशानंतर नव्या नव्या प्रयोगाच्या निमित्ताने अयशस्वी होण्याचाही हक्क त्याला आहे. त्यावरून त्याच्याविषयी कोणी निर्णायक निष्कर्ष काढू गेले तर तो निश्चितपणे त्या कलावंतावर अन्याय होईल. तरी पण अयशस्वी प्रयोगातही त्या कलावंताचे अव्वल सामर्थ्य पुरेपूर प्रतीत झाले पाहिजे अशी अपेक्षा नक्कीच करता येईल. 'अपराजितो'पासून अगदी 'चारुलता' 'कापुरुष-महापुरुष', 'अभिजान', 'महानगर', 'नायक' इत्यादि चित्रपटांपर्यंत ही अपेक्षा सत्यजित राय यांनी कमजास्त प्रमाणात पुरवली. नवा 'चिडिया घर' याला अपवाद ठरला आहे. रहस्यपट म्हणावे अशा या चित्रपटात काही पुसट जागा सोडल्यास सत्यजित यांची एकही थबथबीत खूण आढळत नाही.

शरदेन्दु बॅनर्जी यांच्या कथेचे एवढे एखादा चित्रपट निर्माण करण्याएवढे आकर्षण सत्यजित यांना का वाटले असावे याचे या चित्रपटात तरी उत्तर एकच संभवते. कथांचे अनेक प्रकार तसा हाही एक रहस्यप्रधान प्रकार एकदा हाताखालून जावा असे त्यांना वाटले असेल. पंचपक्वान्ने जेवणाराला मेळेचे आकर्षण सटीसहामासी एखादे वेळी वाटू शकते. या चित्रपटापुरते इतकेच म्हणता येईल की ही मेळदेखील पचपचीत आहे. रहस्यपटच काढायचे तर चोप्रांचा गाजलेला 'कानून' त्याच घाटणीचा 'वह कौन थी ?' हे खरे मातबर रहस्यपट; 'चिडिया घर' त्याहूनही 'इत्यादी–वगैरे'मधे बसेल.

## लक्षात राहाणाऱ्या काही जागा

या चित्रपटातून काहीच महत्त्वाचे पदरी पडत नाही हे एकदा गृहीत धरल्यावर सत्यजित यांच्या तंत्र–सामर्थ्याचे अनेक छोटे छोटे प्रत्यय त्यात सापडतात. विविध व्यक्तिरेखांचे संयोजन आणि संचालन अनुरूप नटनटींद्वारे त्यांनी बरेच कुशलतेने केले आहे. विशेषतः कॉलनीतले रहिवासी खुनाच्या प्रसंगी खुनाच्या परिसरात वावरताना दाखविताना त्यांनी चित्रण आणि संकलन–तंत्राचाही चांगला वापर केला आहे. वैशिष्ट्यपूर्ण विस्कळीत तपशीलातून वातावरण आणि व्यक्तिरेखा सांधीत नेण्याचे त्यांचे सामर्थ्य अगदी आरंभाच्या श्रेयनामावलीपासून जाणवते. डिटेक्टिव्ह व्योमकेशचे या चित्रपटातले स्थान आणि त्याचे व्यावसायिक व्यक्तिमत्व ते श्रेयनामावली संपण्याआतच आपल्यावर बिंबवून पुढील कथाविस्ताराला मोकळे होतात. निशानाथ यांच्या खुनानंतरची दमयंतीची अवस्था दाखविण्यासाठी, मागे येऊन तिच्याशी बोलणारा व्योमकेश आणि विजयकुमार ते पूर्ण 'आउट ऑफ फोकस' करून धूसर दाखवितात आणि तुलनेने कॅमेऱ्याला जवळ आणि सामोरी शोकग्रस्त दमयंती तितकीच रेखलेली, सुस्पष्ट, अगदी जड ठेवतात. दमयंतीपर्यंत

व्योमकेशचे शब्द पोचतात, तो किंवा विजयकुमार पोचू शकत नाहीत. शोकग्रस्त दमयंतीचे मुळी एक वेगळेच एकाकी गडद जग तयार झाले आहे. इतर सगळे त्यात परलोकातले असावे तसे अस्पष्ट, धूसर वाटते. हा परिणाम हातखंडा सफाईने सत्यजित यांनी साधला आहे. परंतु हा मुळी या चित्रपटात उपराच राहतो. कारण दृश्य वास्तवापलीकडील भावजीवनातले वास्तव प्रकट करणे हे या कथेचे उद्दिष्टच नव्हे. इथे आहे रहस्य आणि त्याचा येन केन प्रकारेण उठाव. यात सत्यजित फार फार लटके भासतात. विशेषतः डॉ. भुजंगदासाच्या अँग्लोइंडियन वसतीतल्या गुप्त संचाराचा आणि व्योमकेश त्याच्या पाठीवर असतो त्याबद्दलचा भाग तंत्रदृष्टचा ठाकठीक असूनही एखाद्या निकृष्ट हिंदी स्टंटपटात साजेसा परिणामहीन वठतो. पार्श्वसंगीताऐवजी क्वचित काही ध्वनी वापरून परिणाम साधण्याचा संगीतकार सत्यजित यांचा प्रयत्न येथेही आहे. फक्त, इथे तो वाया जातो. या दिग्दर्शकाचा प्रत्येक चित्रपट तयार करण्यामागचा दृष्टिकोनच मुळी निकोप भावनाप्रधान आहे; त्याचे रहस्यपटाशी जमणार कसे? सखोल, भावुक आशय-विषयाचा शोध घेत तो एका प्रगल्भ संयमी मनाने कथेतल्या प्रत्येक प्रसंगात उतरतो; आणि इथे तर आहे केवळ एका रहस्याशी रिकाम्या वेळचा खेळ. या खेळाला हिचकॉकसारखा, जीवनातल्या आशयाचा आणि खोलीचा बडिवार न करता पण त्या प्रकारच्या हुशार हुलकावण्या देत प्रेक्षकांच्या उत्कंठेशी आपल्या तंत्र–चातुर्याने खेळणारा जादूगारच हवा; किंवा एखादी अॅगाथा ख्रिस्ती हवी.

## स्मृती पुराणी

हिंदी चित्रपटाला साजेसा विषय घेऊन सत्यजित यांनी 'अभिजान' सारखा आपल्या शैलीने अधिकच खुमासदार बनलेला चित्रपट यामागे निर्माण करून दाखवला. बुवाबाजीसारखा सांकेतिक विषय पत्करून 'महापुरुष' सारखा मजेदार लघुपट सादर केला. परंतु या 'चिडियाघर' मध्ये त्यांचे सामर्थ्यच नेमके त्यांच्या उणीवा ठरले आहे. पळण्याच्या शर्यतीत हेवी वेट पहेलवानाने भाग घ्यावा तशी सत्यजित यांची गत इथे झाली आहे.

ठीकच आहे. ज्याने कितीएक बेभान आणि सुंदर क्षण दिले आणि अजूनही जो असे असंख्य क्षण देईल इतका उमेदीत आहे, त्याचे असे एखादे दारूण अपयश-देखील कृतज्ञतेपोटी सुसह्य मानले पाहिजे. 'चिडियाघर' चे तिकीट काढावे आणि मधून मधून 'पथेर पांचाली'तली काव्यात्मदृश्ये, 'अपराजितो' मधले 'ओपू'च्या पितृवियोगाचे झपाटून टाकणारे तबल्याच्या द्रुत लयीतले क्षण, 'ओपूर संसार' मधले ओपूच्या क्षणभंगूर संसाराचे रम्य स्वप्नसदृश प्रकरण, 'चारुलता' मधले सुस्थित नायिकेच्या निरुद्योगी कंटाळ्याचे सुरेख, सुस्त चित्रण, 'महानगर' मधली तुमच्या माझ्या घरातली वाटणारी घरगुती, सांसारिक दृश्ये, 'अभिजान' मधली वहिदा रहेमानची टॅक्सीवाल्याच्या प्रियेची अवीट भूमिका असे पुष्कळ काही पडद्यावरच्या बिनमहत्त्वाच्या दृश्यांच्या आधारे आठवत बसावे.

तरीही एक खरेच, सत्यजित महाराजांचे तूर्तास काही खरे दिसत नाही. ◻

# २ ज्योत्स्ना आणि ज्योती

मराठी रंगभूमीवर प्रेमाचे अनेक गंभीर--विनोदी, भावुक--तिरकस, वेडे--वाकडे प्रकार आजवर आले. इष्कावरची उर्दू शायरी आली, वैवाहिक जीवनावरचे तेच तेच चरबट विनोद आले. उद्दीपक पोषाख, प्रसंग आणि वाक्ये आली. कुमारी मातेचा प्रश्नदेखील वेगवेगळ्या संदर्भात येऊन जुना झाला. परंतु माणसाच्या विशुद्ध लैंगिक भुकेला आणि तिच्या संबंधीच्या विकृत्यांना एकाही नाटककाराने सरळ सरळ स्पर्श केला नव्हता. प्रा. गंगाधर गाडगीळ यांचे 'ज्योत्स्ना आणि ज्योती' हे या विषयावरचे पहिले मराठी नाटक म्हणण्याला हरकत नाही. दिल्लीच्या नाट्य--विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी याचे पहिले प्रयोग दिल्लीत केले आणि नुकतेच त्यांनी हे नाटक मुंबईच्या साहित्य संघ मंदिरात करून दाखवले. प्रेक्षकांपैकी कोणाला यातल्या अंगावर शहारे आणणाऱ्या किळसवाण्या प्रतिमांनीच मळमळले तर कोणी गंभीर जागी मुक्तपणे हसत होते आणि विनोदांचा गंभीरपणे विचार करीत होते. कोणी घरगुती गोष्टी कुजबुजत्या स्वरात केल्या आणि क्वचित काही गाढ झोपले.

संघमंदिरातील या वाताहतीचे मुख्य कारण म्हणजे मुळात लैंगिक भावना ही एक भावना म्हणून आपल्या जीवनात मोकळेपणाने आपण तिला स्थानच देत नाही. तिच्याविषयी धीट विचार किंवा चर्चा टाळतो. ती फार फार खासगी आणि एखाद्या गुन्ह्याप्रमाणे चोरटी बाब मानतो. तिच्याबाबत फार फार तर चार चावट, अश्लील किंवा बीभत्स शब्द आपल्या अगदी खासगी बैठकीत, आसपास कोणी स्त्री नाही (फक्त स्त्रियांच्यातला हा प्रसंग असेल तर पुरुष नाही) असे पाहून बोलून घेतो. लैंगिक विकृत्यांविषयीदेखील आपल्याला एक उत्सुकता असते ती लैंगिक साहित्याच्या किंवा ज्यात लैंगिक विकृती हा विषय आहे अशा साहित्याच्या एक प्रकारच्या आसुसल्या वाचनाने आपण भागवीत असतो. अशा प्रकारच्या विकृत्यांनी झपाटलेली माणसे हा एखाद्या गंभीर आणि मनोविश्लेषणात्मक नाटकाचा विषय म्हणून आपण वृत्तीने पत्करण्यालाच तयार होत नाही. रंगभूमीवर मांडण्याचे विषय आपल्या मते ठरून गेले आहेत; त्यात हा विषय नाही.

परंतु संघमंदिरातील प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांचे केवळ एवढेच कारण नव्हते.

ज्योत्स्ना आणि ज्योती या पाठोपाठच्या बहिणींचे कथानक या नाटकात रंगवले आहे. ज्योत्स्ना मोठी, ज्योती लहान. ज्योत्स्ना काही एका प्रसंगाने लैंगिक भुकेविषयी हाय खाल्लेली तरुण स्त्री; वयाने एकीकडे लैंगिक ओढ वाटणारी आणि त्याच वेळी त्या गोष्टीविषयी घृणा बाळगणारी. याउलट ज्योती निकोप यौवनाने मुसमुसलेली, अनेक पुरुष भोवती जमवून त्यात सुख घेणारी. यात अच्युत नामक एक नाटककार असतो. तोही ज्योत्स्नाप्रमाणे पण वेगळ्या कारणांनी प्रत्यक्ष लैंगिकतेला भिऊन स्त्रीसहवासाची मानसिक ओढ बाळगीत असतो. अपूर्ततेच्या वेदनेने तळमळत असतो. या लैंगिक गंडाला एक कलात्मक रूप देऊन कलावंत म्हणून हे आपले स्वतंत्र आणि अनिवार्य दुःख असल्याचे निराळे सुख घेत असतो. याउलट रवींद्र हा ज्योतीसारखा निकोप वृत्तीचा, सळसळत्या तारुण्याचा पुरुष.- लहान मोठ्या कोणत्याही शरीरसुखांत पुरेपूर रस घेणारा.

याशिवाय एक व्यक्तिरेखा, हे नाटक व्यापून राहिलेली असते. ही विधवा मावशी. तारुण्य उमलण्याआतच हिला वैधव्य आले आणि नंतर हिचे सर्व लैंगिक जीवन केवळ मानसिक आणि अप्रत्यक्ष झाले. भोवतालच्या लैंगिक जीवनात ती स्वतःला पाहते आणि एक आंबट–सुख घेते. लैंगिकतेविषयीचे गंड, संवेदनाक्षमता वगैरे समजण्याची तिची कुवत नाही. कोणताही पुरुष आणि कोणतीही स्त्री एकत्र आली की तिला ते पुरे.

## बेडूक, तो, आणि दिलीपकुमार–तीन प्रतिके

अशी ही पाच माणसे – या पाचांचे हे कथानक. परंतु आणखीही काही गोष्टी पाचांप्रमाणेच या नाटकात, अप्रत्यक्षपणे, पण डोकावून, वावरून जातात. एक मोठा गिळगिळीत, टरारून फुगलेला बेडूक ज्योती-ज्योत्स्नाला दिसत असतो. रवींद्राशी विवाह झालेली सुखी ज्योती हा प्रथम एका शाब्दिक लैंगिक उद्रेकात जोत्स्नापुढे उभा करते. आणि नंतर जोत्स्नाला तो दिसू लागतो, भेवडावतो. दुसरा टेलिफोनवरून बीभत्स शब्द उच्चारणारा ' कोणी एक '. पहिल्या अंकापासून याचा फोन ज्योत्स्नाला उद्देशून वाजतो. दुसऱ्या अंकात याचे शब्द – बेडकाइतकेच गिळगिळीत, नागवे – भयभीत ज्योत्स्नाला ऐकू येतात. रवींद्राला ती त्याच्यामागे फटफटीवरून पिटाळते. अपघात घडतो. रवींद्र कमरेखाली पांगळा होतो. आता ज्योतीची अवस्था ज्योत्स्नासारखी होते. ज्योतीला त्याचे गलिच्छ फोन येतात. उलट ज्योत्स्ना ज्योतीप्रमाणे होते. परंतु नाटकाअखेरी पुन्हा एकदा ज्योत्स्नाला ' तो ' त्याच्या त्या गिळगिळीत शब्दांनी बोलावू लागतो आणि आता ज्योत्स्ना सरळ त्याच्यासाठी एका निश्चयाने निघून जाते. याशिवाय दिलीपकुमारसारखा दिसणारा एक रांगडा, अशिक्षित, दांडगट तरुण या नाटकात त्याच्याविषयीच्या उल्लेखांनी सतत वावरतो. कुणा एका विमलीला तो गॅरेजमध्ये भोगतो. नंतर मावशीच्या अर्धवट पुतण्याशी – नारायणशी – त्याच

अडलेल्या विमलीचे लग्न लावून मावशी त्यात सुख घेतात. विमली सुखी आहे असे मानतात. परंतु शेवटी विमली पुन्हा त्या दिलीपकुमारमागे गेल्याचे कळते. पहिला 'बेडूक', दुसरा 'तो' आणि हा दिलीपकुमार, म्हणजे वस्तुत: एकाच लैंगिक अनुभवाची तीन रूपे आहेत. परंतु स्वतंत्र व्यक्तिरेखा असल्याइतकी आवर्जून ही तीनही प्रतीके गाडगिळांनी नाटकातून कमजास्त अप्रत्यक्षपणे वावरत ठेवली आहेत. या तीन प्रतीकांविना, उरलेल्या पाच व्यक्तिरेखांच्या रंगमंचावरील अस्तित्वाला काही अर्थच उरणार नाही.

केवळ व्यक्तिरेखांच्या मानसिक व्यापारांतून आणि प्रतीकांद्वारे पुढे सरकणारे हे कथानक, हे प्रेक्षकांच्या प्रतिकूल प्रतिक्रियांचे दुसरे कारण. या प्रकारच्या कथानकाची त्यांना सवय नाही. उत्तम स्वगतांसाठी जुजबी मनोव्यापार आणि केवळ दाद देण्यासाठी काव्यात्म गहिरी प्रतीके ही त्यांची एरवीची सवय, त्यांना हे नाटक गोंवळवते. रवींद्रच्या आकस्मिक अपघाताव्यतिरिक्त एकही नाट्यपूर्ण 'घटना' रंगमंचावर घडत नसल्याने या शब्दप्रधान नाटकाबरोबर वाहत जाण्याचे ते मनाने नाकारतात.

या नाटकाचे संवाद हेही याचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. गाडगीळांच्या संवादांना येथे ओघ नाही. शिवाय ते फार वाङ्मयीन होतात. एका वेगळ्या पातळीवर विद्याधर गोखले यांच्या संगीत नाटकातील संवादांचे जे होते तेच नेमके गाडगीळांचे या नाटकात झाले आहे. संवादातून नाटक सहजपणे फुलत नाही. प्रतिमा आणि प्रतीके उपरी राहून जातात. व्यक्तिरेखातोंडची आपापल्या मनोव्यापारांची अभिव्यक्ती सहज वाटण्याऐवजी कृत्रिम वाटते. लेखक पदोपदी जाणवतो. परिणामी या नाटकात पूर्णांशाने मावशी आणि काही अंशी ज्योती आणि रवींद्र सोडल्यास बाकी पात्रे तकलादू, केवळ एका फॉर्म्युल्याच्या सिद्धीसाठी उभी केलेली प्रयोगशाळेतली निष्प्राण उपकरणे वाटतात. गोखल्यांच्या हलक्या फुलक्या, संगीताला टेकू म्हणून उभ्या केलेल्या कथानकांना हे सर्व चालून जाते. गाडगीळांचा विषय भक्कम आणि कोणाही समर्थ नाटककाराला आव्हान ठरावा असा असल्याने तो या निष्प्राण साधनांनी आणि विशेषत:, टाकल्याजागी जडावून पडून राहणाऱ्या वाङ्मयीन संवादांनी फारच परिणामहीन ठरला आहे, प्रेक्षकांपासून अखेरपर्यंत फटकून राहिला आहे. एरवी, नाट्यगृहांबाहेर पडल्यावर वकूबाप्रमाणे काहीही मतप्रदर्शन करणारा प्रेक्षक नाट्यगृहात पक्का रंगमंचाकडे बांधून धरणे हेच अशा प्रकारच्या धीट आणि प्रभावी विषयांवरच्या नाटकांचे यश असते.

नाट्यविद्यालयाचे एक अध्यापक कमलाकर सोनटक्के यांनी दिग्दर्शित केलेल्या प्रयोगात नाटकाविषयीची निष्ठा पुरेपूर जाणवत होती. कमी पडले ते नाटक तसेच अभिनयसामर्थ्य. ज्योत्स्ना म्हणून उषा साठे पुरेशा 'तेज' वाटल्या नाहीत. त्यांना समज मात्र पुष्कळच आहे हे कळूनही ही समज तीव्रपणे प्रेक्षागृहांत पोचवण्याला त्यांचा शब्द आणि मुद्रा, दोन्ही कमी पडत राहिली. मावशीच्या भूमिकेत अंजला

महर्षी अशाच समजुतीन वावरल्या आणि त्यांच्यापुरते नाटक त्यांनी प्रेक्षागृहात बव्हंशी पोचवले देखील. ही भूमिका हे लेखकाचेही उल्लेखनीय यश आहे. नाटककार अच्युतच्या भूमिकेत मुकुंद नाईक प्रयत्नपूर्वक वावरत होते. रवींद्र म्हणून कमलाकर सोनटक्के पंगू अवस्थेत प्रभावी वाटले, आधीचा उसळत्या शरीराचा रवींद्र उभा करताना त्यांचे शरीर कमी पडत होते. ज्योती झालेल्या उत्तरा बावकर अशाच त्या व्यक्तिरेखेतले उसळते 'शरीर' दाखवण्याला शरीरानेच फार कमी पडल्या. प्रयोगाच्या या मर्यादा जमेस धरल्या तर तो एरवी नाटकाला न्याय देणारा होता. निदान त्याने नाटकावर अन्याय केला नाही हेही प्रा. गाडगीळ यांच्या दृष्टीने पुष्कळच झाले.


नेपथ्य, प्रकाशयोजना, अवांतर 'इफेक्ट्स' या सर्वांत एक शिस्त जाणवत होती.

पुष्कळ दिवसांनी असे खरोखरी 'डोक्यावरून' जाणारे भक्कम विषयावरचे मराठी नाटक मुंबईकरांना भेटले. एरवी सौ. विजया मेहता विलायतेस गेल्यामुळे या व्यायामाला तूर्त सगळे मुकल्यासारखे आहेत. ◻

## ३ सराई

आत शिरल्यावर पाहिले तर हे हो कसले प्रदर्शन? भिंती ओक्या-बोक्या, कसली गडबड–धांदल–गर्दी नाही, रंगीबेरंगी सजावट नाही. मुंबईतील 'युसिस'च्या इमारतीतील त्या दालनात जेमतेम अर्धा डझन हायक्लास हिंडती माणसे आणि लांबोडकी मेजे पांढऱ्याशुभ्र आवरणांनी सजवून त्यावर साठ-सत्तर पुस्तके विरळ विरळ मांडलेली. वातावरणात शांतता आणि गांभीर्य. वाटले की कसल्या तरी पूजेला आलो आहोत. ती पुस्तकांची पूजाच होती. पुस्तकांच्या कलात्मक आखणी संपादणीचेच ते प्रदर्शन होते. अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ ग्राफिक आर्टसतर्फे ते भरले होते. एकेक पुस्तक म्हणजे एकेक ऐवज वाटेल असे काळजीपूर्वक आणि स्वतंत्रपण ठेवले होते. ही पुस्तके पाहताना मानेला आणि पाठीला प्रेमळ गुदगल्या होऊ लागल्या तेव्हा हा कोण दोस्त म्हणून वळून पाहिले तर तेही पुस्तकच होते–रबरी दोरीला खुबीने लटकवून अधांतरी झुलत ठेवलेले. जागोजाग असे दोस्त भेटतील अशी व्यवस्था होती. प्रथमदर्शनी वाटले, इथे पाहण्यासारखे काय आहे? पण प्रत्यक्षात वेळ कमी पडला आणि अगदी नाइलाजाने एवढ्याशा जागेतल्या त्या कलाभांडाराचा निरोप घ्यावा लागला.

छपाई आणि पुस्तकाची सजावट ही चित्रकला आणि संगीत-कलेसारखीच एक कला आहे हे आपल्याकडल्या मोजक्या प्रकाशकांना आणि छपाई करणारांना आता पटले असले तरी




**पोशाखावरून माणूस तसे सजावटीवरून पुस्तक ओळखता येत होते.**

वाचकांना ते बरेच पटायचे आहे. पुस्तक वाचायचे तसे पाहायचेही असते हे आपण किती लक्षात ठेवतो? देशमुख आणि कंपनीने काढलेले, हेमिंग्वेच्या 'ओल्ड मॅन अॅन्ड द सी'चे पु. ल. देशपांडेकृत भाषांतराचे 'एका कोळियाने' हे उंची सजावटीचे पुस्तक आणि रेल्वेटाइमटेबल यातला मजकुराचा फरक आपण तेव्हाच समजतो पण दोन्हींच्या आखणी संपादणीतला निश्चित कलात्मक फरक आपल्या लक्षात यायला जरा वेळच लागतो—त्याहून लौकर किंमतीतला फरक समजतो. पण कलाकृती आणि उपयुक्त माहितीचा भारा या दोहोंच्या मांडणीत फरक असणे आवश्यक नाही का? त्याहूनही, एखादी विशेष कलाकृती आणि सामान्य कलाकृती यांच्या मांडणीतदेखील तो फरक खरे म्हणजे जाणवला पाहिजे. तसेच ललित कलाकृती आणि संशोधनात्मक लेखन; किंवा काव्य आणि नाटक; किंवा धर्मग्रंथ आणि विनोदी लेखसंग्रह यांच्या मजकुराची जात आणि प्रत जशी वेगळी तशी इतर बाह्यांग आणि अंतरंगाची जातही वेगळीच असली पाहिजे. याने त्या त्या प्रकारच्या मजकुराला केवळ शोभाच येत नाही तर त्यातील आनंददेखील वाढतो. आपल्याकडीलच उदाहरणे देऊन म्हणायचे तर पद्मा सहस्रबुद्धे यांच्या काव्यात्म सजावटीने काव्यसंग्रहाची नाही तर काव्यात्म ललित गद्याच्या संग्रहाची लज्जत वाढते आणि वसंत सरवटे यांच्या चित्रांनी कोणताही विनोदी लेखसंग्रह असेल त्याहून जरा जास्त बऱ्यापैकी वाटतो. एखाद्या ऐतिहासिक नाटकावरचे प्रभाकर गोरे यांनी काढलेले मुखपृष्ठ त्या नाटकाहून जास्त अव्वल ऐतिहासिक वातावरण प्रभावीपणे निर्माण करते. लोकगीतांचा एखादा अस्ताव्यस्त संग्रह केवळ चित्रकार दलालांच्या सजावटीमुळे आणि उत्तम, कलापूर्ण छपाईने आकर्षक आणि संग्राह्य भासतो. त्या

उलट रियासतकार सरदेसाईंची साधीबगडी मराठी रियासत आणि हरि नारायण आपटे यांच्या जुनाट छपाईच्या रोमहर्षक कादंबऱ्या सजावटी अभावी आपण वाचण्याला आज तेवढेसे खूष नसतो. समजा, मोहरेदार कागदावर सुबक, स्वच्छ छापलेल्या हरीभाऊंच्या कादंबऱ्यांना चित्रकार गोडसे किंवा दलाल किंवा बाळ ठाकूर यांची अंतर्बाह्य सजावट असेल, तर त्या आपल्याला आजही अधिक आवडतील. पोषाखावरून माणूस तसे सजावटीवरून पुस्तक ओळखता यावे आणि आकर्षक वाटावे असे हे पुस्तक–सजावटीचे–'बुक डिझाइनिंग'चे शास्त्र आहे. अद्याप सरसकट अनकरंगी दिलखेचक मुखपृष्ठांच्या काळात वावरणाऱ्या आपल्या तुलनेने पाश्चात्य देशांत ते खूप प्रकट झाले आहे.

## स्वतंत्र 'व्यक्तिमत्त्व'

या अमेरिकन पुस्तक–सजावटीच्या प्रदर्शनातच त्याचे नमुने पाहायला मिळाले. सजावटीने एकेका पुस्तकाला एक स्वतंत्र 'व्यक्तिमत्त्व' प्राप्त झाले होते. धार्मिक स्तोत्रांचे पुस्तक एखाद्या ख्रिचन दशग्रंथी ब्राह्मणासारखे अंतर्बाह्य वजनदार, धार्मिकतेच्या त्या जुन्या काळात आपल्या टाइपाने, मांडणीने, चित्रांनी आणि मारदस्त कव्हरानेदेखील नेणारे आणि अथपासून इतीपर्यंत कसे योजनाबद्ध वाटत होते. हाती धरून एकेक पृष्ठ उलगडू लागले की 'यात काय', 'त्यात काय' या ऊठबैस संशय आणि अश्रद्धेच्या काळापासून आपोआप अलग व्हायला होत होते. या उलट एका विशिष्ट गावाविषयीच्या छायाचित्रांचेच स्मरणिकेसारखे एक पुस्तक सुंदर छायाचित्रांच्या सुंदर मांडणी–छपाईतून आपल्याला त्या गावातच नेऊन अल्लद ठेवीत होते. एका पुस्तकात एका ऐतिहासिक अमेरिकन सिंदबादची रोजनिशी होती. आजच्या काळातल्या त्या तुमच्या आमच्यासारख्या माणसांच्या गावातून उठलो

आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे त्या संबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने हवा तसा होऊ शकत नाही. त्यातून डिसेंबर १९६८ पर्यंतच्या कवितांची निवड पूर्ण झाली असल्याने या पुढील कवितांची दखल घेणे, किंवा त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करणे जवळ जवळ अशक्यच आहे. तसेच 'माणूस'कडे पाठवलेल्या लेखासोबत पुरेसे टपाल हशील जोडावे.

–संपादक

केव्हा आणि त्या धाडसांच्या आणि अखंड भटकंतीच्या कलंदर अनुभवात येऊन पडलो केव्हा हेही नीटसे कळू नये, असे हे पानापानांतून मजकुराचा आत्मा आपल्या पृष्ठ क्रमांकापासून चित्रांच्या शैलीपर्यंत वैशिष्टयपूर्णतेने प्रकट करणारे पुस्तक होते. छायाचित्रांच्या एका पुस्तकात थडगी आणि त्यांवरचे मृत्यूलेखच फक्त होते. पण हेही मानवी संस्कृतीचे एक अभ्यसनीय, उद्‌बोधक अंग आहे हे या पुस्तकाची जाड जाड पाने नुसती चाळूनही समजत होते. थडग्यांच्या चित्रांसाठीदेखील त्या प्रकाशकाने आणि छापखानेवाल्याने केवढी काळजी आणि कष्ट घेतले होते! (नाहीतर आपल्याकडच्या काही पुस्तकांतून कशीतरी छापली जाणारी जिवंत माणसांची मृतात्म्यांसारखी कळाहीन छायाचित्रे!) एका पुस्तकात जगातल्या चिल्ल्यापिल्ल्यांनी केलेल्या इटुकल्या पिटुकल्या इंग्रजी कविता होत्या. फारशी चित्रे नसलेल्या या साध्यासुध्या पुस्तकात कवितांची छपाई आणि रचना खूप गोजिरवाणी, लोभस होती. ही रचनाही चित्रांसारखी बोलकी होती. आणखी एका पुस्तकात इसापच्या गोष्टी होत्या. त्यातले कोल्हे, गाढवे, सिंह, उंदीर आणि माणसे केवळ सुरेख चित्रित केलेलीच नव्हती तर या चित्रांसाठी योजलेली शैली, ही कोल्हे–गाढवे–सिंह–उंदरादि सृष्टी कोणाच्या प्रतिभेतली आणि ही प्रतिमा कोणत्या काळातली ते सांगत होती. दोन जाडजूड थोराड पुस्तकांत पक्षीच पक्षी होते. हे पक्षी नुसतेच रंगीत नव्हते किंवा चित्रे म्हणून देखणे नव्हते; तर त्यांचा प्रत्येक तपशील चित्रकाराने कसोशीने चित्रित करून पक्ष्यांची एक चित्रमय चिरंजीव बखरच तयार केली होती. ही बखर चित्रकाराइतक्या कसोशीने आणि जीव ओतून छापखानेवाल्याने छापली होती आणि प्रकाशकाने या सर्व कष्टांची कदर ठेवून खर्चाची किंवा किमतीची तमा न ठेवता तिला साजेशी बांधणी–मांडणी दिली होती. बालवाङमयाच्या एका पुस्तकात फुले, पक्षी, झाडे, माणसे आणि अगदी सिंह–वाघदेखील असे गोंडस, गोजिरे रेखाटले–रंगवले–छापले–मांडले होते की पुस्तकात अल्लद शिरून त्या अद्‌भुत सृष्टीत आपणही सामील होऊन एका पानावर मजेने बसण्याचा अनावर मोह होत होता.

वेळ किती–कसा गेला ते कळलेच नाही. एका दालनातल्या त्या साठ–सत्तर लहानमोठ्या कागदी चौकटीत मिळून जवळपास तेवढ्याच कलावंतांच्या कल्पकतेचे आणि प्रतिभेचे संपन्न दर्शन घडलेसे वाटले. पुन्हा सगळे बिनबोभाट–धक्के न घेता, देता, जिवाची धावपळ आणि परवड न करता, अगदी एकाग्रतेने शांतपणे. कलेचा प्रत्यय जसा आणि ज्या वातावरणात मिळावा, तसे. प्रदर्शन बघून थकवा येण्याऐवजी उलट दिवसभराचा थकवा जाऊन कसे टवटवीत, प्रसन्न वाटत होते.

अशी वाचनीय तितकीच प्रेक्षणीय, साहित्यदृष्ट्या दर्जेदार तेवढीच कलापूर्ण पुस्तके आणि एखाद्या सराईप्रमाणे श्रांत जिवाला आराम देणारी बिनभपक्याची निवांत प्रदर्शने जास्त हवीत. ○



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## गाईडबाबत मार्गदर्शन

परवाच परभणीची बातमी वर्तमानपत्रात वाचली. मुलांचा सध्या पाठ्य-पुस्तकं विकत घेण्याचा हंगाम आहे. पण परभणीचे पुस्तक–दुकानदार मुलांना नुसती पुस्तकं देत नाहीत. सगळ्या भाषा विषयांची 'गाईडस्' घेतली तरच बाकीच्या विषयांची पुस्तकं तेथील दुकानदार देतात. नाही तर देत नाहीत म्हणतात. खेड्या-पाड्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना हा त्रास जास्त होतो अशी तक्रार आहे.

वर्तमानपत्रातली ही बातमी वाचली आणि मी सुन्न होऊन बसलो. (म्हणजे तसा बसलेलोच होतो पण थोडी पोज बदलून बसलो, इतकेच. असो.) ग्रामीण भागातले लोक आता पुष्कळच सुधारलेले आहेत अशी बातमी मधून मधून काना-वर पडत असते. त्यांचा विकास झाला आहे, जागृती झाली आहे हेही कानावर पडते. पण परवाची बातमी वाचून मात्र माझा भ्रम नाहीसा झाला. खेड्यातली मुलं काय, पालक काय–सगळेच अडाणी गोळे आहेत याची खात्री पटली. अरे, यात तक्रार करण्यासारखं काय आहे मुलांनो ? परभणीतल्या अशा बुद्धिमान दुकान-दाराचे उलट कौतुक करायला पाहिजे. पुस्तके आली की पाठोपाठ गाईडस् आलीच ! गाईडस्‌शिवाय पुस्तके घेण्याची पद्धत कोठून काढली या माणसांनी ? नुसती पुस्तकं कधी समजतात तरी का शाळेत ? तुम्हांला नुसतं शाळेत जायचं आहे की परीक्षेत पासही व्हायचं आहे ? केवळ शाळेत जायचं असेल तर घ्या खुशाल पाठ्यपुस्तकं नुसतीच विकत. बसा ठणाणा करीत. पण परीक्षेत पास व्हायचं असेल तर मात्र बाळांनो, गाईडं घेतलीच पाहिजेत बरे. अगदी नीट लक्षात ठेवा.

गाईडस्‌शिवाय पुस्तके या कल्पनेनेच माझ्या अंगावर काटा आला. उद्या गाईड हा थोर वाङ्मय–प्रकार नाहीसा झाला तर काय अनर्थ होईल ! मूळ पुस्तके एकवेळ नाही घेतली तरी चालतील, पण गाईडस्‌चे महत्त्व अबाधित आहे. मागे एक इंग्र-जीचे हुषार प्राध्यापक वर्गात मुलांना म्हणाले होते– " It's better you should buy your text-books. So that you will follow your guides!'

खरेच आहे ! गाईडस् नीट समजावीत यासाठीच पाठ्य पुस्तकांची केवळ गरज आहे. उद्या ही 'गाईडे,' 'प्रदीप' 'मार्गदर्शक' बंद झाले तर काय होईल माहीत आहे ? शाळेत शिक्षकांना शिकवावे लागेल आणि त्यांची पाचावर धारण बसेल. रोजच्या रोज धडे वाचायचे, त्यांतल्या कठीण शब्दांचे अर्थ काढायचे, महत्त्वाचे प्रश्न कोणते ते सांगायचे आणि सबंध कवितेचे, धड्याचे महत्त्व, विशद करायचे इतका सगळा उपद्व्याप मास्तर लोकांना करीत बसावा लागेल: हा शुद्ध, धडधडीत वगैरे जो काय म्हणतात तो अन्याय आहे. गाईडं नाहीत म्हटल्यावर अनेक प्राध्यापकांवर तर उपासमारीचा प्रसंग येईल. पुस्तक प्रकाशकांना आपले बंगले आणि मोटारी विकाव्या लागतील ! आहात कुठे तुम्ही ? सगळीकडं नुसता हाहाःकार उडून जाईल. म्हणून ग्रामीण भागातील मुलांनो आणि पालकांनो, तक्रार करण्यापूर्वी थांबा आणि विचार करा. आधी फक्त गाईडस् विकत घ्या. ती नीट समजली नाहीत तरच पाठ्य–पुस्तकं विकत घ्या आणि दुकानदाराचे उलट आभार माना. कारण शिक्षणशास्त्र त्यालाच खरं कळलेले आहे.

## मलेशियातील रांगडा कारभार

मलेशिया देशाबद्दल मला फारशी माहिती नाही. तुम्हालाही ती नसणारच. टुंकू अब्दुल रहमान हे नाव आठवते, त्यांनी आपल्याला पाठिंबा दिला होता म्हणून. पण बाकी काही माहीत नाही. पण ते असू द्या. एक माहिती मात्र परवा या देशाबद्दल मिळाली. ती म्हणजे या देशात कसल्याही प्रकारची रसिकता नाही, ही ! तुम्ही म्हणाल, हा फार गंभीर आरोप झाला. याला पुरावा काय ? पुरावा आहे. पुराव्याशिवाय मी बोलेन कसा ? तुम्हाला ठाऊकच आहे की पद्मिनी आणि रागिणी या त्रावणकोरच्या दोघी बहिणी प्रसिद्ध नृत्यतारका आहेत. त्यांचे नृत्याचे कार्यक्रम भारतातच नव्हे तर बाहेरही होत असतात. परवा अशाच काही कार्यक्रमांच्या दौऱ्यावर त्या मलेशियात गेल्या होत्या. कार्यक्रम झाले, पैसेही मिळाले. पण तिथल्या सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना अडकवून ठेवले. कार्यक्रमाच्या उत्पन्नावरील आयकर भरल्याशिवाय आम्ही तुम्हाला भारतात जाण्याची परवानगी देणार नाही असे या अधिकाऱ्यांनी बजावले आहे. आता बोला ?

आठ–दहा दिवस झाले तरी हा वाद चालू आहे. आता ही गोष्ट खरी की, नाचण्याचे पाचच कार्यक्रम करण्याची परवानगी दिलेली असताना त्यांनी पंचवीस कार्यक्रम केले. या सगळ्या कार्यक्रमांवरील सरकारी कर झाला आठ हजार डॉलर्स. बहिणी बहिणींनी चार हजार डॉलर्स भरले. उरलेली रक्कम कंत्राटदार भरणार होते. पण त्यांनी ते भरलेच नाहीत. त्यामुळे या बहिणींना अडकवून ठेवण्यात आले. इकडे त्यांच्या पाच बोलपटांची कामे खोळंबून राहिली आहेत आणि तिकडे त्या मलेशियन सरकारच्या आडमुठपणामुळे कोंडून पडल्या आहेत. काही उपाय

दिसत नाही. त्यांना पैसे भरावेच लागणार आणि मगच त्या इकडे येणार. काय करणार काय बिचाऱ्या ?

मला तर ही बातमी वाचल्यावर असा संताप आला म्हणता ! अरे, तुम्ही स्वत:ला सरकारी अधिकारी म्हणवता आणि सिनेमानटी, नृत्यतारका यांचे महत्त्व ओळखत नाही ? त्यांच्या पाठीमागे धावण्याऐवजी त्यांना अडकवून ठेवता ? आणि मलेशियन सरकारदेखील डोळ्यांवर कातडे ओढून घेऊन हा अन्याय सहन करते ? धि:कार, धि:कार असो अशा अरसिक, सौंदर्यद्वेष्टया, कलाहीन दुष्ट सरकारचा ! हीच गोष्ट आमच्या भारतात कधीतरी घडली असती काय ? आमच्याकडे असे कधीही झाले नसते. सरकारच्या दहावीस हजार रुपये कराची किंमत ती काय ? नाही पैसे मिळाले तर नाही मिळाले. त्यात काय एवढे मोठेसे ! आमच्या सुसंस्कृत अधिकाऱ्यांनी अशा कार्यक्रमांना आधी सरकारी परवानगीची गरजच भासू दिली नसती. "करा हो खुशाल वाटेल तेवढे प्रोग्रॅम ! परवानगीची तुम्ही काय काळजी करता ? आम्ही आहोत ना." असे प्रेमळपणे सांगितले असते. शक्य तितक्या कार्यक्रमांना वायकापोरांसह पहिल्या रांगेत (फुकट) बसून त्यांनी हे कार्यक्रम नीट पार पडत आहेत, याची दक्षता घेतली असती आणि चुकून कर भरण्याचा प्रश्न उपस्थित झालाच असता तर हा कर कोणत्या मार्गाने बुडवता येईल, याची माहिती सरकारी कायद्याचाच कीस काढून मोठ्या आपुलकीने पुरवली असती. अशा पैशां-साठी त्यांना अडकवून ठेवण्याचा अधमपणा तर आम्ही चुकूनही केला नसता आणि समजा, एखाद्या नतद्रष्ट अधिकाऱ्याने असा प्रसंग आणलाच तर आमचे मंत्री तरी काही झोपलेले नाहीत ! त्यांच्या कानावर ही गोष्ट जायचा अवकाश, इकडे परवा-नगीची ऑर्डर अन् तिकडे त्या अधिकाऱ्याच्या बदलीची ऑर्डर, दोन्ही गोष्टी क्षणात घडल्या असत्या. आपल्या पंडितजींनी देविका राणीशी कसा हास्यविनोद केला, वैजयंतीमालेला त्यांनी फराळासाठी कसे बोलावले आणि स्वत:च्या हाताने (म्हणजे हातातल्या सुरीने) जपानी खरबूज कापून तिला कसे खायला दिले, याची चटकदार हकीकत आपण सगळ्यांनीच मिटक्या मारीत वाचलेली आहे. पंडितजींचे सोडा, ते तर रसिकांचे बादशहाच होते. पण आपली बाकीची मंडळीही काही कमी नाहीत. 'फिल्म–फेअर' पारितोषिकांच्या प्रत्येक समारंभाच्या वेळी आपले मंत्री मुंबईत हजर असतात की नाही ? नट-नटींना बक्षिसे देताना दिसणारा त्यांचा प्रफुल्लित चेहरा आपण किती तरी वेळा पाहिलेला आहे. आपले मराठी मंत्री आणि मराठी नटनटी यांचे संबंध तर फारच आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे आहेत, असे ऐकिवात आहे. मद्रासमध्ये तर सिनेमावालेच आता सत्तेवर आहेत. छे: छे: ! आमच्याकडे अशी घाणेरडी, असंस्कृत घटना कधीच घडली नसती. आमचे परराष्ट्र खाते काय करीत आहे ? निदान मलेशियन सरकारकडे एक निषेधाचा खलिता तरी त्यांनी पाठवावा. आपल्या हातात दुसरे काय आहे ?

# ताडीमाडीच्या प्रदेशात साडीचा विजय


आपल्या गोमंतकातलीच ही कहाणी आहे बरे का ! पणजीच्या पीपल्स हायस्कूल-मध्ये घडलेली. पणजीमधल्याच एका प्रतिष्ठित घराण्यातील मुलीने साडी नेसून शाळेत येण्याचा आग्रह धरल्यामुळे या शाळेच्या चालकांनी तिला प्रवेश देण्याचे नाकारले. मुलीच्या नातेवाईकांचे म्हणणे असे की, या शाळेत निळा स्कर्ट व पांढरा ब्लाऊज असा गणवेष विद्यार्थिनींसाठी ठरवला आहे. पण ही आमची कन्या थोराड असल्यामुळे तिने निळी साडी व पांढरा ब्लाऊज परिधान केला तर बिघडले कुठे ? पण शाळा-चालकांना हे म्हणणे मान्य नाही. शाळेचे चालक ते. शिस्तीचा प्रश्न केव्हाही महत्त्वाचा नाही का ? त्यांचे म्हणणे असे की, पोषाखावरून शाळेत जातीय व धार्मिक भेदाभेद दिसू नये हा आमचा उद्देश आहे. म्हणूनच आम्ही त्या मुलीला साडी वापरायला परवानगी दिली नाही. मागे दोन मुली खमीस सलवार घालून येत होत्या. पण त्यांनाही आता हा पोषाख घालायला बंदी केलेली आहे.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिस्तीच्या दृष्टीने केलेला हा नियम सगळ्याच विचारी आणि निधर्मी माणसांना पटण्यासारखा आहे. पण या मुलीचे पालक तितकेसे समंजस दिसत नाहीत. त्यांनी या तथाकथित अन्यायाविरुद्ध गोव्याच्या शिक्षण-खात्याकडे तक्रार केली. शिक्षण-अधिकाऱ्यानेही या तक्रारीची लगेच दखल घेतली हा तर एक चमत्कारच होय. त्यांनी म्हणे लगेच एक पत्रक काढून सगळ्या शाळांना कळवले की मुलींना साडी किंवा स्कर्ट यांपैकी कोणत्याही एका पोषाखाची निवड करण्याची मोकळीक असली पाहिजे. साडीला बंदी करता येणार नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे साडीचा विजय झाला.

हे सर्व वृत्त वाचल्यावर मन कसे खट्टू झाले. इकडे आमचे सरकार निधर्मी वृत्ती लोकांच्या मनात बाणवण्याचे कसोशीने प्रयत्न करीत आहे आणि एखाद्या शाळेच्या बुद्धिमान मुख्याध्यापकांनी त्यास अनुसरून एखादा उत्कृष्ट नियम काढून त्याची अंमलबजावणी केली की सरकारचेच शिक्षणखाते त्यांचा गळा धरते ! या स्थितीला ' झपूर्झा ' म्हणावे की आणखी काय म्हणावे ? गोव्याच्या शिक्षणाधिकाऱ्याने तरी थोडा विचार करायला हवा होता ! पालक लोक अडाणीच असतात. त्यांना काय बोलायचे ? [ खरे म्हणजे आईबापांना आपली मुले नेहमी लहानच वाटतात. पण या पालकांना मात्र आपली मुलगी मोठी आहे असे वाटले. आहे की नाही कमाल ?] पण शिक्षणाधिकारी तरी निधर्मी वृत्तीचे असावेत ! स्कर्ट अन् ब्लाऊज हा किती सुंदर पोषाख आहे बरे ! पोषाखातली वस्तू कोण, कुठल्या जातीची, कुठल्या धर्माची याचा पत्ता लागत नाही हे किती महत्त्वाचे आहे ! सगळीकडे असेच व्हायला पाहिजे. मला तर वाटते की पणजीतल्या पीपल्स हायस्कूलच्या मुख्याध्या-पकांनी या अन्याय्य आज्ञेला मुळीच भीक घालू नये. साडी नेसल्याबरोबर ही मुलगी

हिंदू ' आहे हे सगळ्यांना ताबडतोब ओळखता नाही का येणार ? या देशात अमुक एक ' हिंदू ' आहे असे समजणे किती धोक्याचे आहे !... मुख्याध्यापकांनी तर याच्या पुढे घोडदौड करावी. अजिबात घाबरू नये. साडी तर त्यांनी काढून टाकावीच. पण मुलींच्या हातातल्या बांगड्या फोडाव्यात अन् कपाळावरचे कुंकू फरफटावे. बांगड्या आणि कुंकू ही देखील चिन्हे धर्म दाखवणारी आहेत. याबाबतीत त्यानी दयामाया म्हणून दाखवूच नये. तसेच मुलींच्या नावावरूनही धर्म चट्दिशी ओळखता येतो. एखादीचे नाव ' गंगा ' किंवा ' गोदावरी ' असले तर ती हिंदूच असणार हे उघड आहे. एखाद्या मुलीचे नाव ' फातमा ' किंवा ' नजमा ' असले तर स्कर्ट ब्लाऊज असूनही ती मुसलमान आहे हे सगळ्यांना ओळखता येणारच. आणि एखादीचे नाव ' जेबी ' नाहीतर ' रुस ' असेल तर ती मेंढरांच्या कळपातली आहे हे काय सांगायला हवे ? नावांनीसुद्धा धर्म कळतो. तसा तो कळणे बरे नाही. म्हणून आमची सूचना अशी आहे की शाळेत आल्यावर मुलींना मुळी नावे असूच नयेत. शाळेच्या रजिस्टरमध्ये नावासमोर क्रमांक घालावेत आणि या क्रमांकानेच मुलींना ओळखण्याची, हाक मारण्याची पद्धत रूढ करावी. उदाहरणार्थ ' आठवी क' मधील क्रमांक तेवीस या मुलीने वक्तृतात पहिले बक्षीस पटकावले. ' ' एस्. एस्. सी. मध्ये सर्व मुलींत कुमारी एकूणचाळीस ही पहिली आली आहे. ' ' बॅटमिंटनचा सामना जिंकणाऱ्या कुमारी बेचाळीस व कुमारी एकोणीस यांच्या समवेत मुख्याध्यापकांचे छायाचित्र '... वगैरे. अशी निधर्मी पद्धत रूढ केल्यास देशाचे केवढे कल्याण होईल !






## मी मीरा कृष्णमयी

आकाशाचा रंग निळा, तसे मेघही सावळे
सरी तेथल्या भरती, एक सरोवर निळे
निळ्या सरोवराकाठी, घर निळे रंगलेले
निळ्या घरामध्ये आहे, सर्व काही निळेकाळे
निळ्या पायघड्या खाली, काळी साडी नेसलेली
कृष्णकेशसंभाराची, काळ्याभोर नयनांची
कृष्णकृष्ण बोलणारी, काळी एकतारी हाती
कृष्णरूप आहे सारे, परि एक विसंगति
मीरा म्हणे नको मला, मोतियाची माझी काया
कारण जी आहे माझ्या, कृष्णजीच्या अंतराया
वीष वीष ज्या म्हणती, असे अमृत प्राशिते
कृष्णमयी होउनि पुरती, कृष्णरूपी लीन होते

*जे. ठाकूर*

# आषाढस्य प्रथम दिने...

विष्णु तुकाराम गुंजाळ

'...संपलं. खलास झालं आहे सगळं.'

'इतक्या लवकर ? लग्न होऊन अजून चार महिनेही झाले नाहीत.'

'त्याबद्दल नाही म्हणत मी. लग्न झालं नि सुख माझं दुणावलं आहे. पण एखाद्या लठ्ठ माणसाला नायटा व्हावा ना मानेला ? नायटा ? तसा नायटा झाला आहे माझ्या मनाला. म्हणजे actually नायटाच असं नाही. पण मनाचा एक कोपरा सारखा खाजवतो आहे. चिडला आहे. म्हणजे तुला कळणार नाही मी काय म्हणते ते. पण...कुठंतरी मनात खोल सारखी फुण्फुण् फुण्फुण् होते आहे. सारखं...'

'खरं सांगू ? रागावणार नाहीस ? तुझ्या मनात काहीतरी सलतं आहे. काही-तरी उणं वाटत आहे तुला. काय सलतं आहे माहीत आहे मला. पण ती चूक तुझी आहे. आता खूप उशीर झाला आहे नि काही उपयोग नाही आहे आता. म्हणजे उपयोग म्हणजे उपयोगच असं नाही पण...नवऱ्याची टेस्ट् तुला आता वाटेनाशी झाली आहे.'

'असंच नाही आहे काही पण...पण म्हणजे मला त्याचा वीट आला आहे असं नाही. पण का कोण जाणे एक प्रकारची पोकळी माझ्या मनात निर्माण झाली आहे. पोकळी म्हणजे actually पोकळी असंच नाही आहे काही पण कसली–तरी रुखरुख, कसला तरी ठसका, कळ लागावी तसं मनात होतं आहे. दुखतं आहे कुठंतरी...'

'अग, पण त्याला काही इलाज आहे आहे का ? वेळ गेली म्हटलं ना. संपली वेळ. आता बसा जन्मभर हाय हाय करीत.'

'त्याच्यावर काहीच इलाज नाही ?'

'नाही.'

'नक्की नाही ?'

'नक्की म्हणजे आहे. नाही असं नाही. पण रामबाण गुणाची शक्यता कमी.'

'बोल, बोल तू.'

‘ रोगापेक्षा अघोरी उपाय आहे.’

‘ अघोरी ?’

‘ हो. एकदम जालीम. ’

‘ सांग तू. ’

‘ तू कुणाला तरी शोधते आहेस. कुठेतरी हरवून जाऊ इच्छिते आहेस. कुणाच्या तरी पापणी आड लपायचं आहे तुला. जीव तोडून कुणावर तरी प्रेम करायचं आहे. ती तळमळ. ते ताटकळत वाट पाहणं. ते झुरणं. तो लपंडाव, ती अस्वथता, तो गिडीनेस, ती बेफिकिरी, घावरट हळवा संशय. कुणीतरी देखणा तरुण तू शोधते आहेस. ’



‘ जालीम उपाय सांगणार होतीस तू. ’

‘ मी सांगण्याआधीच तू त्याचा उपयोग करू लागली आहेस. ’

‘ मी नाही समजले. ’

‘ वेड घेऊन पेडगावला जाऊ नकोस. ’

‘ खरंच, नाही समजले. ’

‘ लग्न झालं तरी तू अरविंदाच्या आठवणीनं झुरते आहेस. ’

‘खोटं कशाला बोलू पण...’

‘ ...पण इथंच परत सुख तुला चकविणार आहे. हुलकावणी इथंच बसणार आहे परत. धोका इथंच आहे. ठोकर म्हण. आणि ते सहन करण्याची ताकद तुझ्यात नाही आहे आता. नव्हतीच म्हणा. पण आता तर मुळीच नाही आहे. जे हाती आलं आहे तेही तू सोडून टाकणार आहेस, या जालीम उपायानं. याच जालीम औषधानं एक चूक करून बसलीस. आता दुसरी. ’

‘ मग काय करू म्हणतेस मी ?’

‘ मघाशीच सांगितलं. यावर निश्चित असा इलाज नाही आहे आता. वेळ गेली आहे. ’

‘ म्हणजे आयुष्याच्या अंतापर्यंत मी अशीच राहणार आहे ? दुःखी, कष्टी, अस्वस्थ, असमाधानी ?’

'तेही मघाशीच सांगितलं. ती चूक सुधारता आली असती तुला. जीव तोडून प्रेम केलं होतंस तू त्याच्यावर. पाहत होते मी. कॉलेज सोडल्यानंतर चार वर्षे थांबलीस. त्यालाही तिष्ठत ठेवलंस. शेवटी करायचं ते तुझ्या मनासारखं केलंस. आता मनाला खाण्यात काय अर्थ आहे ? जग हसलं असतं. पण त्याला तू जिंकलं असतंस!'

'गोष्ट खरी आहे. पण सगळ्या माझ्या आकांक्षा त्याच्याकडून पुऱ्या होतील असं कधीच वाटलं नाही मला.'

'आणि तरी तू प्रेम करीत राहिलीस त्याच्यावर.'

'हो. प्रेम करीत राहिले. अजूनही आहे. त्यानं तर जीवापाड प्रेम केलं माझ्यावर, पण कुठंतरी तो मला उणा वाटायचा. अपरा वाटायचा. आणि त्यामुळंच तो म्हणत असतानाही मी त्याच्याबरोबर लग्न केलं नाही. आयुष्यात मी त्याच्याइतका जीव कुणावर टाकणार नाही. पण का कोण जाणे मला तो ' सूट ' व्हायचाच नाही.'

'शशी, मग आता विव्हळण्यात काय स्वारस्य आहे ?'

'तेही खरंच म्हणा. पण वाटतंच की नाही माणसाला !'

'वाटतं की. चांगलाच पेच पडतो. आयुष्याची कसोटी लागते. नशीब बलवत्तर असेल तर...'

'बैस की. फार घाईत आहेस ? बैस तरी निवांत. आज आपण पिक्चरला तरी जाऊ या. कॉलेजमध्ये असताना, चोरून जात होतो तशा. मजा यायची नाही ? अगदी मजा यायची. गेले ते दिवस. मोरपिसासारखे हुळहुळणारे. तो कॉलेजचा पहिला दिवस. बापरे! पहिली टर्म म्हणजे हॅवॅक. पाऊस पडतो आहे. सर जीव तोडून शिकवताहेत. मागच्या बाकावर बसून आपण अश्लील चित्र काढतो आहोत. एक-मेकांना दाखवतो आहोत. तेवढ्यात बेला येणार. शुकशुक करणार. मग सरांचा डोळा चुकवून पळून जाणं. पिरिएडला दांडी मारून मॅटिनी टाकणं. मग दुपारची ती कुंद कॉफी-ब्लँकीट सोडवत नसे नाही ? मग ती चर्चा. आठवणी कॅडबरीसारख्या अजून मी चघळते आहे. ती धुंदी. ते हुळहुळणं. ती नीला उमराणी आठवते तुला ? ती ग. ज्युनिअरची. ती कथा वाचताना रडली ती. इतकं भावनावश होऊ नये माण-सानं. नाही ? छे. हे हे म्हणजे अगदी कळसच. सानेगुरुजींना तरी काय व्हायचं ? शेवटी काय झालं ?'

'अग तू बोल ना.'

'शेवटी कळस झाला तरी तुम्ही रडताच की नाही ?'

'रडतो ग. माणूसच आहोत आपण.'

'मग सानेगुरुजींना तरी नाव का ठेवायची ?'

'बघ बाई. लागलीस वादविवाद घालायला तू. मरू दे ते. किती दिवसांनी येते आहेस. आता मात्र पिक्चरशिवाय मी तुला सोडणार नाही.'

'नको गडे. जाते मी. घाईत आहे. सहज म्हटलं आहेस का बघावं. खूप वेळ होईल आता.'

'वेळ ? हात मेली. आता दुपारी काय करणार आहेस ?'

'काही नाही ग पण आपलं हेच...'

'हल्ली दिसत नाहीस ते. इकडं कशी आलीस ?'

सहज. इकडं माझी ऑफिसमधली एक मैत्रीण राहते तिच्याकडं...

'ऑफिसमधली मैत्रीण की मित्र ?'

चल. तुझं आपलं काहीतरीच.

'खरंच ?'

'खरंच.'

'अगदी खरं ?'

'अग खरंच.'

'बंडल नको मारूस. तुझे डोळेच सांगताहेत. काय भानगड आहे ग ?'

'भानगड ?'

'नाही म्हणजे ? तू इकडं कशी ? आणि हे बघ, सुलू एक विचारू ?'

'विचार ना. अशी पहातेस काय माझ्याकडे ?'

'त्या अविनाश वागळेचं लग्न झालं ग ?'

'ते मला काय माहीत.'

'तेही खरंच म्हणा. मात्र परवा तो माझ्याकडं आला होता...'

'कोण अविनाश ?'

'का आश्चर्य वाटलं ?'

'नाही आश्चर्य असं नाही पण...'

'मग सांग त्याचं लग्न झालं की नाही ?'

'माझ्याकडून सारं वदवून घ्यायचं ठरविलं आहेस का ? तुला माहीत आहे सारं शशी.'

'मग वेळ का आता ? उरकून टाकावं. किती दिवस निष्ठत ठेवणार आहेस त्याला ?'

'मी आता 'हो,' म्हणेन पण त्यानं मनावर घ्यायला हवं ना ?'

'काय म्हणतोय काय तो ?'

'दुसरं काय म्हणणार ? बघू.'

'तू इतकी निराश होऊ नको गडे सुलू.'

'निराश ? आणि मी ? उगीच का इकडे आले !'

'सुलू आली तशी पावसासारखी गेली. मला उगीचच वाटायला लागलं. सुलूनं परत यावं. जाऊच नये...' ○

# नेपाळ राजकारण

कृष्ण गंडकीवरचा झुलता पूल ओलांडून आम्ही त्या गावात प्रवेश केला. एक व्यवस्थित पोशाख केलेला नेपाळी आमच्याकडे कुतूहलाने पहात होता.

" स्विस, अम्रकिन या जापानी ?" अर्धवट स्वतःशी, अर्धवट आम्हाला उद्देशून तो पुटपुटला.

" नहीं, इंडियन !" त्याच्याकडे हसत पाहत मी म्हणालो.

" भारतीय ! हाम्रो भाई, हम भी तुम्हारे जैसे हिंदू हैं।" त्याच्या चेहऱ्यावर दिलखुलास हास्य फुलले आणि बोलता बोलताच आम्ही एकमेकांना नमस्कार केला. कोठून आलात, कोठे चाललात वगैरे नेहमीची प्रश्नोत्तरे झाली. त्याच्या गावाच्या वेशीपर्यंत आम्हांला पोचवायला आला होता तो.

हे उत्स्फूर्त स्वागत, हा मनमोकळेपणा पुढे पुढे आमच्या परिचयाचा झाला.

# जुने आणि नवे ? ? ?

सामान्य नेपाळी माणसाची भारतीयांबद्दलची भावना ही अशी — मैत्रीची, बरोबरीची, परिचित माणसे भेटल्यावर जो आनंद वाटतो तशी. नाही तरी नेपाळच्या अंतर्भागात हिंडणारे तरुण भारतीय भेटतात कोठे त्याला. बहुतेक भारतीय येतात ते काठमांडूला, पशुपतिनाथाचे दर्शन घ्यावयास; आणि मुक्तिनाथाचे दर्शन घ्यायला कोणी आलेच तर परलोकाकडे दृष्टी लागलेले म्हातारे किंवा सामान्यांशी दुरून वागणारे साधू. नेपाळच्या अंतर्भागात काही ना काही निमित्त काढून येतात ते गोरकाय लोक. त्यांच्याबद्दल त्याला वाटतं कुतूहल, अचंबा किंवा संशयमिश्रित आदर. भारतीयांबद्दल ही कोणतीच भावना असण्याचं कारण नाही, कारण बहुतेक प्रत्येकजण भारतात राहून आलेला आहे, या ना त्या कारणाने.

"आपण दोघंही हिंदूच की," हे उद्गारही काही कमी वेळा नाही कानावर पडले. धर्म ही फारशी महत्त्वाची गोष्ट नाही, अशी शिकवण मिळालेल्या आमच्यासारख्या सुशिक्षित हिंदूंच्या मनात त्यामुळे संमिश्र तरंग उठत हे मात्र खरे. खरंच, धर्म समान म्हणून एखादा मनुष्य दुसऱ्याबद्दल आपुलकी दाखवू शकतो हीच गोष्ट आश्चर्य करण्याजोगी वाटायची; आणि असं वाटायचं, आपल्याबद्दल जो माणूस एवढा स्नेह दाखवतो त्याची माहिती तरी आपल्याला किती आहे ! नेपाळी इतिहास कोठे आपण पढलो होतो ? त्याच्या सद्य:स्थितीबद्दल तरी पुरेशी माहिती कोठे आहे आपल्याला ? जुन्या आणि नव्या नेपाळी माणसाची ओळख करून घेतल्याशिवाय नेपाळदर्शनाचा आमचा प्रपंच पुरा कसा होणार होता !

जुन्या नेपाळी माणसाचा शोध घ्यावयास एके काळी सरोवर असलेल्या काठमांडू खोऱ्यातच परत गेलं पाहिजे आपल्याला. कारण पूर्वीसुद्धा 'नेपाळ' हे नाव बहुधा एवढ्याशा प्रदेशालाच असावं. दक्षिणेकडचा तराईतला भाग वैशाली, कोसल अशा भारतीय राज्यांमध्ये मोडायचा. या राज्यांच्या सीमेवर हिमालयाच्या कुशीत राहणारे लोक किरात या नावाने महाभारत कालापासून सुप्रसिद्ध. बसक्या नाकाच्या, पसरट चेहऱ्यांच्या आणि बारीक डोळ्यांच्या या लोकांचा 'सोनेरी कातडीचे लोक' असा उल्लेख आहे महाभारतात. या किरातांची राज्ये – तसं म्हटलं तर जनपदे- काठमांडू खोऱ्यात व त्याच्या पूर्वेकडे पसरलेली होती. पण नेवारी म्हणतात की काठमांडू खोऱ्यात पहिली वस्ती आमची होती, किरातांच्याही पूर्वी! कदाचित् शक्यता अशीही आहे की तेथे राहणाऱ्या सर्वच लोकांना 'किरात' या नावाने पूर्वी संबोधित असावेत. त्यात नेवारही आलेच. नाही तरी ते सुद्धा तिबेटच्या बाजूनेच आलेले, म्हणजे मंगोलियन वंशाचेच. आर्य टोळ्या हिंदुस्थानात येण्यापूर्वी किराती लोक बिहार, उत्तर प्रदेश या भागातही पसरलेले असावेत. आर्यांनी त्यांना उत्तरेकडे रेटल्यामुळे काठमांडू खोऱ्यापर्यंत ते मागे हटले असावेत.

## हिंदुधर्माची प्रतिष्ठापना

इ. स. पूर्वी सातव्या शतकात म्हणजे गौतम बुद्धाच्या जन्मकाळी तराईत कपिलवस्तू येथे शाक्य लोकांचं राज्य होतं. आता हा प्रदेश नेपाळात मोडतो. म्हणून बुद्धाचं जन्मस्थान नेपाळात गेलेलं. मौर्यकाली मात्र हा प्रदेश त्यांच्या राज्यात मोडत होता. अशोकाने बुद्धाच्या जन्मभूमीस भेट दिली. त्याने उभारलेला स्तूप अजूनही लुम्बिनीस पाहावयास मिळतो. अशोकाची एक मुलगी चारुमती काठमांडूस येऊन राहिली. तिने देवपाटन येथे स्तूप बांधला आणि बौद्ध धर्माचा प्रचार केला. येथून तो धर्म तिबेटमध्ये पोचला. यावेळीही किराती राजेच काठमांडूला राज्य करीत होते. त्यांचे आणि मौर्यांचे संबंध सलोख्याचे असावेत.

सम्राट अशोकाच्या मृत्युनंतर शतका–दीड शतकाच्या अवधीत शक व कुशान टोळ्यांनी भारतावर आक्रमण केले. हल्लीच्या नेपाळचा दक्षिण प्रदेश कुशानांच्या सार्वभौमत्वाखाली आला. कुशान राजांची नाणी नेपाळमध्ये सापडतात. कुशान राजांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे नेपाळातही या धर्माचे अधिष्ठान कायम राहिले. या अधिष्ठानास धक्का बसला गुप्त कालात. किराती राजांचा पराभव करून लिच्छवी घराण्याने काठमांडूचे सिंहासन जिंकले होते. या घराण्यातील भास्करवर्मन राजाचे चंद्रगुप्ताला सहाय्य झाले. प्रतापी भास्करवर्मनने गंगेच्या खोऱ्याचा पुष्कळसा भाग आपल्या ताब्यात ठेवला होता. या हिंदू राजाने बौद्ध धर्मीयांशीही मैत्रीचे संबंध जोडले होते. मात्र शैव पंथीय हिंदूंना साहाय्य करून त्याने नेपाळमध्ये हिंदुधर्माची प्रतिष्ठापना केली. सुप्रसिद्ध पशुपतिनाथाचे देवालय याच कालात बांधले गेले असावे. लिच्छवी घराणे प्रजासत्ताक राज्यपद्धतीबद्दल प्रसिद्ध आहे. राजाच्या सत्तेवर लोक-

प्रतिनिधीमंडळाचे नियंत्रण होते. चंद्रगुप्त–विक्रमादित्याच्या कालापासून मात्र ही पद्धत मागे पडली व राजघराण्याच्या सार्वभौम सत्तेची पद्धत प्रचारात आली. या काली भारतात प्रवास करणारा फाहाएन हा चिनी प्रवासी लुम्बिनी व कपिलवस्तूला येऊन गेला होता, पण त्याच्या वृत्तान्तात नेपाळचा उल्लेख नाही.

सम्राट हर्षवर्धनाच्या साम्राज्यात हा भाग येत होता, पण स्वतः हर्ष लुम्बिनीला आला होता की नाही, याबद्दल वाद आहे. हर्षाच्या कालात म्हणजे इ. स. ६३० मध्ये अंशुवर्मन या राजाने काठमांडूला ठाकुरी घराण्याची सत्ता स्थापन केली. हे ठाकुरी लोक हिंदुस्थानातूनच आलेले, कदाचित ते रजपूत असावेत. नेपाळच्या गादीवर ज्या घराण्यांनी राज्य केले, ती घराणी इतर प्रदेशांतून नेपाळमध्ये गेलेली आहेत. सध्याचे शाह घराणेही रजपूतच.

अंशुवर्मन स्वतः शैवपंथीय पण सहिष्णू. त्याच्या सहिष्णुतेची चिनी प्रवासी ह्यूएन्‌त्संगाने स्तुती केली आहे. हे सद्‌गृहस्थ नेपाळात आले होते. नेपाळी लोक गलिच्छ आणि दिसायला ओंगळ आहेत, असे ते म्हणतात. कदाचित तराईतल्या थारू लोकांशीच त्यांचा संबंध आला असावा. अंशुवर्मन पराक्रमी योद्धा आणि बहुश्रुत विद्वान म्हणून प्रसिद्ध. त्याची मुलगी भृकुती हिने तिबेटच्या राजाशी लग्न करून तिबेटमध्ये बौद्ध धर्मास उत्तेजन दिले, अशी एक कथा प्रचलित आहे, पण तिला ऐतिहासिक आधार नाही. या कालात तिबेट आणि चीनशी नेपाळचे व भारताचे संबंध मैत्रीचे होते. चिनी सम्राटाचे दूत तिबेट व नेपाळमार्गे हर्षाच्या दरबारात येऊन पोचले.

चिनी भाषेतल्या टांग वंशावळीमध्ये या कालातील नेपाळबद्दल सविस्तर माहिती आढळते. अलिकडच्या युरोपीय प्रवाशांप्रमाणच नेपाळी लोक दिसायला उमदे आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे असल्याचा उल्लेख त्यात आहे. शेतीपेक्षाही व्यापार त्यांस अधिक प्रिय होता. हर्षवर्धनाच्या काळात बानेपा खिंड सापडली आणि चीन व तिबेटातून दक्षिणेत येण्याचा जवळचा, सोपा रस्ता मिळाला. त्यामुळे व्यापारास चालना मिळाली. सोनारकाम, लोहारकाम हे धंदे नेपाळात जोरात चालत. या कालातील तांब्याची नाणी खूप सापडतात. रुप्याची मात्र क्वचित. आश्चर्याची

परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस
सहा साहसे — दा. सी. देसाई
मूल्य प्रत्येकी दोन रुपये
राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

गोष्ट म्हणजे लोखंडाचा उपयोग सुरू झाल्याचा पुरावा मिळत नाही. नेपाळातील लोकरीच्या रजयांचा उल्लेख कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात केलेला आहे. मात्र कपडे शिवण्याची कला अजून ज्ञात नव्हती. ज्योतिषशास्त्रात लोक विशेष प्रवीण होते. बुद्धकीर्ती, शैलमंजुश्री अशा प्रकांड बुद्धपंडितांनी तिबेटमध्ये जाऊन बुद्धधर्माची दीक्षा तिबेटींना दिली. या धर्मप्रसारास भारतातील सुप्रसिद्ध विक्रमशीला विद्यापीठाने विशेष साहाय्य केले. पॅगोडा या विशिष्ट बांधणीच्या देवळांचा प्रसार याच कालात चीन व इतर बौद्ध राष्ट्रांत झाला.

हर्षवर्धनानंतर उत्तर भारतातील परिस्थिती अतिशय अस्थिर बनली. परकीयांचे हल्ले सुरू झाले आणि त्यांची झळ प्रथम राजपुतान्यातील रजपुतांनी सोसली. बाप्पा रावळने भीम पराक्रम गाजवून इस्लाम धर्मीयांच्या लाटा थोपवून धरल्या होत्या. पण तो बलदंड पुरुष गेला आणि हिंदुस्थानची कवाडे खुली झाली. एके काळी मैदान गाजवलेली रजपूत घराणी देशोधडीला लागली. इस्लामी धुमाकुळापासून त्यांना आश्रय मिळाला तो हिमालयाच्या कुशीत. नेपाळमधील राजकीय परिस्थितीही त्यांच्या स्वागतास अनुकूलच होती. ठाकूर राज्य काठमांडू, पाटण आणि भटगाव अशा तीन छोट्या परगण्यांत विभागले गेले होते. या तीन छोट्या राज्यांत नेहमी भांडणे चालत. या यादवीचा फायदा घेऊन राज्य स्थापन करणे रजपुतांना जड गेले नसावे. इ. स. १२०० च्या सुमारास अशा तऱ्हेने मल्ल घराण्याची राजवट सुरू झाली.

## नेपाळचा निर्माता

इ. स. १३०३ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने चितोड जिंकले. पुन्हा एकदा रजपूत कुटुंबांवर आपला देश सोडण्याची पाळी आली. यांपैकी काही घराणी मजल दरमजल करीत पाल्याजवळ म्हणजे हल्लीच्या तानसिंग गावाजवळ येऊन स्थायिक झाली. हरिहरसिंह आणि अजयसिंह किंवा कंछा आणि मिछा यांनी या भागात आपली राज्ये स्थापन केली. उदेपूरच्या राजघराण्याचा वारसा सांगणाऱ्या अजयसिंहाचे राज्य पोखरा ते पूर्वेकडे नवाकोटपर्यंत पसरलेले होते. अजयसिंहाचा वारस द्रव्यशाह याने लामजुंग जिंकले, आणि खस जमातीच्या साहाय्याने गुरखा येथील राजाचा पराभव करून आपली राजधानी गुरखा येथे नेली. नेपाळच्या चालू राजघराण्याचा उदय असा झाला, इ. स. १५५९ मध्ये.

काठमांडू आणि त्याच्या पश्चिमेस गुरखा अशा दोन्ही ठिकाणी हिंदू राज्ये स्थापन झाली. हिंदूंच्या वर्ण व जाती—व्यवस्थेचा नेपाळमध्ये शिरकाव झाला. यक्षमल्ल या राजाने तिबेटचा काही प्रदेशही जिंकला. पण मरताना त्यानेही आपल्या राज्याची मुलांमध्ये वाटणी करून घराण्याची सत्ता कमकुवत केली. या तीन राज्यांमधील बेदिलीमुळेच गुरख्यांचा राजा पृथ्वीनारायण यास काठमांडू जिंकणे सोपे गेले.

इ. स. १७२३ मध्ये जन्मलेला पृथ्वीनारायण शाह यास अर्वाचीन नेपाळचा

निर्माता म्हणावे लागेल. इ. स. १७३६ मध्ये भटगावच्या राजाच्या निमंत्रणावरून तो काठमांडू खोऱ्यात आला व मल्ल राजांमधील कलहाचे स्वरूप त्यास पूर्ण माहीत झाले. इ. स. १७४२ मध्ये त्यास राज्यपद प्राप्त झाले. मल्ल घराण्यातील बेबंदशाहीचा अनुभव असल्यामुळे काठमांडू जिकण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या मनात उत्पन्न झाली असल्यास नवल नाही. मात्र त्याची पहिली स्वारी फुकट गेली व जयप्रकाश मल्ल राजाने त्याचा पराभव केला. पण प्रतिपक्षात फूट पाडून आणि फितुरी माजवून शेवटी इ. स. १७६७ मध्ये पृथ्वीनारायणाने काठमांडू जिंकले. त्याआधीच त्याने पश्चिमेकडील व दक्षिणेकडील पुष्कळसा मुलूख आपल्या ताब्यात आणला होता. इ. स. १७७२ मध्ये तो वारला तेव्हा त्याच्या ताब्यात सिमल्यापासून सिक्कीमपर्यंतचा मुलूख मोडत होता. नेपाळमध्ये एकछत्री राज्य त्याने स्थापन केले.

त्याच्या वंशजांनी सिक्किम जिंकले आणि तिबेटवर स्वारी केली. तिबेटने चीनकडे मदतीची याचना केली. चिनी सैन्य आणि गुरखा सैन्य यांच्यामध्ये फार मोठ्या चकमकी उडाल्या. गुरख्यांनी भारतातील कंपनी सरकारकडेही मदत मागितली होती. पण कॅप्टन कर्कपॅट्रिक १७९३ मध्ये काठमांडूला पोचण्यापूर्वीच तिबेट आणि नेपाळ यांच्यांत तह झाला. त्यानंतर गुरख्यांनी कुमाऊ आणि गढवाल जिंकून आपल्या राज्याची सरहद्द थेट काश्मीरला भिडविली.

नेपाळची सत्ता आता कळसास पोचली होती. पण गादीबद्दल कलह आणि रक्तपात नेहमीचा झाला होता. या रक्तरंजित राजकारणात राजाची सत्ता कमी होत गेली



दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
प्रमुख कार्यालय :- राजपथ सातारा
स्थापना :- १९३६.
मावळा सातारा)

आणि भीमसेन थापा या प्रधानाच्या हातात सर्वाधिकार गेले. राज्य आणखी वाढवण्याची ईर्ष्या धरून भीमसेनाने कंपनी सरकारला तराईत डिवचले. गुरख्यांच्या शौर्याचा प्रत्यक्ष प्रत्यय ब्रिटिशांना आला तो या लढायांत. मी मी म्हणणाऱ्या ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांना गुरख्यांनी चांगलेच पाणी पाजले. अखेर सैन्यबळ आणि आधुनिक शस्त्रास्त्रांपुढे त्यांना माघार घ्यावी लागली. इ. स. १८१६ मध्ये तह झाला आणि ब्रिटिश रेसिडेंट काठमांडूला ठाण मांडून तेव्हापासून बसला.

दरबारातील कारस्थाने नित्याचीच झाली होती. भीमसेनच्या प्रतिस्पर्धी पांडे गटाने कारस्थान करून सत्ता हस्तगत केली व भीमसेनास इ. स. १८३९ मध्ये ठार मारले. पण नंतर भीमसेनच्या नातेवाईकाला—मथबार सिंग थापा याला पंतप्रधानपद बळकाविण्यात यश आले.

## राणा घराण्याची सत्ता

मथबार सिंगाबरोबर आणखी एका व्यक्तीने नेपाळच्या राजकारणात प्रवेश केला. या व्यक्तीचे नाव जंगबहादूर कोनवार. स्वतःस डोईजड झालेल्या मथबार सिंगाचा राजाने जंगबहादूरकरवी खून करविला. राजघराण्यातील व्यक्तींमध्ये कलह इतके विकोपास गेले होते की कारस्थाने, खून व रक्तपात ही नित्याची बाब झाली होती. मुत्सद्देगिरीने डावपेच लढवून जंगबहादूरने राजघराण्यांतील निरनिराळ्या गटांना नेस्तनाबूत केले आणि स्वतःची पंतप्रधानपदी नेमणूक करून घेतली. १८४६ मध्ये राजाने त्याला ' राणा 'ही पदवी बहाल केली. राणा घराण्याची सत्ता नेपाळवर चालू झाली.

जंगबहादूरची ब्रिटिश भक्ती सुप्रसिद्ध. तो स्वतःला ' राणीसरकारांचा सर्वांत सच्चा प्रजाजन ' म्हणवून घेई. शिखांविरुद्ध चाललेल्या लढ्यात त्याने ब्रिटिशांना मदत देऊ केली होती. पण डलहौसीने ती नाकारली. इंग्लंडला जाण्याची स्वप्ने तो लहानपणापासून रंगवीत असे. १८५० साली हिंदू सनातन्यांच्या निषेधाला न जुमानता त्याने इंग्लंडची वारी केली. या स्वतंत्र वृत्तीच्या बाणेदार पुरुषाने राणी व्हिक्टोरियावरही छाप टाकली. परत येऊन त्याने तिबेटवर स्वारी केली आणि मागील परामवाचे उट्टे काढले. १८५६ मध्ये निवृत्त होण्याची त्याला लहर आली पण निवृत्त होताच आपल्याला कोणी विचारीत नाही असे पाहताच तो पुन्हा पंतप्रधानपदावर आरूढ झाला.

ब्रिटिशांना मदत करण्याची सुवर्णसंधी त्याला १८५७ साली मिळाली. त्या साली भारतात पेटलेला वणवा विझविण्यास आयती मिळालेली मदत ब्रिटिश नाकारणे शक्य होते. या मदतीबद्दल तराईचा काही भाग नेपाळला परत केला गेला. शिवाय गुरखा सैनिकांना प्रचंड लूट मिळाली ती निराळीच. स्वतः जंगबहादूरला व्हिक्टोरिया राणी आणि चिनी सम्राट या दोघांकडून सन्मानदर्शक पदव्या मिळाल्या पण नानासाहेब पेशवे वगैरे नेत्यांना नेपाळने आश्रयही दिला. १८७५ मध्ये

इंग्लंडला जाण्याची हुक्की त्याला पुन्हा आली. पण हृदयविकार जडून २५ फेब्रुवारी १८७७ मध्ये हा राणा घराण्याचा संस्थापक मरण पावला.

पंतप्रधानपद मुलाकडे न जाता भावाकडे जावे हा नियम जंगबहादुरने घालून दिला. तेव्हा त्याचा धाकटा भाऊ उदिपसिंग पंतप्रधानपदावर आरूढ झाला. ब्रिटिश सैन्यात गुरख्यांची भरती करण्यास याने मोकळीक दिली. त्याचा पुतण्या वीर समशेर याने त्याचा खून पाडला आणि स्वत: गादी बळकाविली. आपले पंतप्रधानपद निर्वेध करण्यासाठी आपल्या मार्गात येणारे भाऊ व प्रतिपक्षाचे लोक यांना हद्दपार करणे व त्यांनी केलेले कट मोडून काढून कटवाल्यांना जबर शिक्षा करणे यातच त्याचा वेळ गेला. १९०१ मध्ये तो मरण पावला आणि त्याचा भाऊ चंद्रसमशेर याला पंतप्रधानपद मिळाले.

राणाशाहीतील कट, कारस्थाने आणि त्याबरोबर होणारी छळणूक याची झळ मुख्यत: काठमांडूच्या परिसरातील लोकांना पोचायची. बाकीच्या भागात तिचे पडसाद क्वचित उमटायचे. ब्रिटिशांबद्दल आदर बाळगणाऱ्या या राण्यांनी कारस्थानातून वेळ मिळेल तेव्हा नेपाळमध्ये शाळा, इस्पितळे, लोखंडाचे झुलते पूल असल्या काही सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या सुधारणा घडवून आणण्याचे श्रेय मुख्यत: चंद्रसमशेर या कर्तबगार राण्यास दिले पाहिजे. त्याच्या कारकीर्दीत अंतर्गत स्वस्थतेमुळे त्याला अनेक गोष्टींमध्ये लक्ष घालता आले.

राज्याचा कारभार सुधारण्यासाठी त्याने निरनिराळी खाती उघडली, त्यांवर पगारी अधिकारी नेमले, त्यांना इनाम देण्याची पद्धत बंद केली, वेठ–बिगारी, गुलामगिरी आणि सती या जाचक प्रथा बंद पाडण्यात त्याला यश आले. जंगबहादूरने सतीची चाल बंद करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याला कडवा विरोध झाला. त्याच्या राण्या त्याच्याबरोबर सती गेल्या होत्या.

काठमांडूला त्याने कॉलेज काढले. दळणवळण सोपे व्हावे म्हणून डोंगराच्या पायथ्यापासून काठमांडू खोऱ्यात त्याने चौदा मैलांची "रोप–वे" बांधली. ती आजतागायत चालू आहे. पुष्कळसे झुलते पूल त्याच्याच अमदानीतले. टपाल, वीज, दूरध्वनी या सोयीही त्यानेच करून दिल्या. जंगलाची निगा राखण्यासाठी स्वतंत्र सेना तयार केली, आणि नेपाळी सेनेलाही आधुनिक स्वरूप त्याने दिले.

ब्रिटनशी मैत्री राखण्याचे त्याने आटोकाट प्रयत्न केले. १९०४ मध्ये तिबेटवर स्वारी करण्यासाठी नेपाळमधून जाण्यास ब्रिटिश सैन्याला त्याने परवानगी दिली. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले आणि शक्य तितकी सर्व मदत देण्याचे त्याने व्हाइसरॉयला तत्काळ अभिवचन दिले. त्यामुळे हजारो गुरखे ब्रिटिश सैन्यात भरती होऊ शकले. आपल्या अंतर्गत कारभारात कोणाचाही हस्तक्षेप होऊ नये याबद्दल मात्र त्याने पूर्ण दक्षता घेतली. कर्झन व्हाइसरॉय असताना नेपाळमधील प्राचीन ऐतिहासिक अवशेष पाहण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. पण ब्रिटिश व्हाइसरॉयने

नेपाळला भेट देण्याची अनिष्ट प्रथा पडू नये म्हणून चंद्रसमशेरने या गोष्टीस नकार दिला !

१९३१ ते १९४५ पर्यंत चंद्रसमशेरचा धाकटा भाऊ जुधा समशेर पंतप्रधान पदावर होता. १९३४ मध्ये नेपाळमध्ये मोठा भूकंप झाला. त्या आधी काही महिने एव्हरेस्टवरून पहिले विमान गेले होते. हे कृत्य ईश्वरास सहन न झाल्यामुळे भूकंप झाला असा सार्वत्रिक समज होऊन जुधा समशेरने नेपाळच्या हद्दीत विमान आणण्यास बंदी केली !

स्वतःच्या धाकट्या भावास पंतप्रधानपद देण्याच्या प्रथेचा एक परिणाम असा होता की पंतप्रधानाची मुले नेहमीच असंतुष्ट रहात. अशा असंतुष्ट राण्यांची संख्या सतत वाढत जाई. नवीन पंतप्रधान बहुतेक या असंतुष्टांना भारतात हाकलून तरी देई किंवा तुरुंगात टाकी. भारतात असंतुष्ट राणा लोक व त्यांचे अनुयायी यांचा एक वर्गच तयार झाला होता. राणाशाहीला विरोध हा त्यांच्यापासून सुरू झाला. १९३८ साली बिहारमधील 'जनता' पत्राने राणाशाहीविरुद्ध अग्रलेख लिहिले आणि राजाला बंदिवासात टाकल्याचा आरोप केला. १९३७ मध्ये एक जनता समिति निर्माण झाली होती आणि तिने प्रक्षोभक पत्रके वाटण्यास सुरुवात केली होती. राणाशाहीपासून देशाची मुक्तता करणे, ब्रिटिश सैन्यात गुरख्यांची होणारी भरती थांबविणे आणि गुरखा सैनिकांना फितवून, त्यांना हाताशी धरून नेपाळ-मधील सत्ता काबीज करणे वगैरे उद्दिष्टे त्यामध्ये दिलेली असत. या समितीला राजा त्रिभुवनकडून सहानुभूती मिळाली हे विशेष. याच सुमारास टंकाप्रसाद आचार्य या पुढाऱ्याने नेपाळी प्रजा परिषदेची गुप्तपणे स्थापना केली. पण १९४० मध्ये परिषदेच्या अस्तित्वाचा सुगावा लागून पुढाऱ्यांना पकडण्यात आले. दोघाजणांना ठार मारण्यात आले. टंकाप्रसाद ब्राह्मण, त्यामुळे त्याला मात्र ठार मारता येईना !

राणाशाहीविरुद्ध चळवळीस आता पद्धतशीरपणे सुरुवात झाली होती. राजा या चळवळींना साहाय्य करतो असा राण्यांना प्रथमपासून संशय होता. राजाची चौकशीही करण्यात आली. प्रकृतीचे निमित्त करून राजाने काठमांडू सोडून कलकत्ता गाठले. पण जुधा समशेरने १९४५ मध्ये आपण होऊन निवृत्ती स्वीकारली. अनिबंध सत्ता गाजविणारा जुधा हा शेवटचा राणा. नेपाळमधील परिस्थिती लोकशाहीस किंवा घटनात्मक राज्यपद्धतीस मुळीच अनुकूल नाही असे त्याचे प्रामाणिक मत होते. ब्रिटनशी दृढ मैत्री ठेवण्याचे परराष्ट्रीय धोरण त्यानेही सोडले नाही. दुसऱ्या महायुद्धात पुन्हा एकदा गुरख्यांची प्रचंड प्रमाणात भरती झाली आणि त्यांच्या शौर्याचा लौकिक जगभर पसरला. चंद्रसमशेरने आधुनिक गोष्टी नेपाळमध्ये आण-ण्याचा पायंडा पाडला होता. जुधानेही यथाशक्ती त्यास हातभार लावून वीरगंज येथे काड्यापेटीचा आणि विराटनगर येथे ताग्याचा कारखाना सुरू केला, आणि राजकीय पुढाऱ्यांना चळवळ करण्यास आणखी एक क्षेत्र खुले केले ! मात्र नेपाळचा

बाहेरच्या जगाशी प्रत्यक्ष संबंध येईल असे रस्ते वगैरे बांधण्याच्या भानगडीत तो मुळीच पडला नाही. अजूनही १२० हमाल एक मोटार सुटे भाग करून आठ दिवसांत काठमांडूला नेत. पण आधुनिक युगाच्या वाऱ्यांना हिमालयही अडवू शकला नाही. राणाशाहीची सद्दी संपत आली होती.

## सुधारणेचे वारे

प्रथमतः या वाऱ्यांचे स्वरूप धार्मिक सुधारणेच्या मागणीचे असल्यास नवल नाही. आर्य समाजापासून स्फूर्ती घेऊन माधवराव जोशी आणि त्यांच्या मुलांनी हिंदू धर्माच्या तत्कालिन स्वरूपात सुधारणा घडवून आणण्यासाठी चळवळीचे निशाण उभारले. पण सनातनी हिंदूंनी राणा चंद्रसमशेरकरवी ही चळवळ बंद पाडली. बाहेरचे जग पाहून आलेल्या गुरखा सैनिकांनी डेहराडूनला १९२१ मध्ये गुरखा लीगची स्थापना केली आणि "गुरखा संसार" आणि "तरुण गुरखा" अशी दोन साप्ताहिके काढली. सामाजिक सुधारणा हे त्यांचे ध्येय होते. बनारसलाही एक साप्ताहिक निघाले. आधुनिक शिक्षणाचे "वाघिणीचे दूध" प्यालेला एक छोटासा सुशिक्षित मध्यमवर्ग डोके वर काढू पाहत होता. राणाशाहीची मदार पुष्कळशी ब्रिटिशांच्या मैत्रीवर अवलंबून आहे ही गोष्ट त्याच्या नजरेतून सुटली नाही. भारतातील विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या या नेपाळींनी भारतीय राजकारणात उडी घेतली. ब्रिटिश सत्ता भारतातून नाहीशी झाल्याशिवाय राणाशाहीवर घाव घालणे हा शक्तीचा अपव्यय आहे हे त्यांस कळून चुकले. १९२० आणि १९३० सालच्या सत्याग्रहात नेपाळींनी गांधीवादी राजकारणाचे प्रत्यक्ष धडे घेतले.

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर भारतीय पुढाऱ्यांबरोबरच अनेक नेपाळी पुढाऱ्यांनाही राणा सरकारच्या विनंतीवरून ब्रिटिशांनी तुरुंगात टाकले होते. १९४५ च्या अखेरीस पुष्कळसे पुढारी तुरुंगातून सुटले. ब्रिटिश राज्य फार काळ टिकणार नाही अशी चिन्हे दिसू लागली होती. भारतीय स्वातंत्र्य दडपून टाकण्यास ब्रिटिशांना मदत करणाऱ्या राणांना स्वतंत्र भारताच्या सरकारकडून पाठिंब्याची आशा मुळीच नव्हती. त्यामुळे ब्रिटिश जाणार म्हणताच त्यांचे धाबे दणाणले.

या परिस्थितीवर उपाय म्हणून इतर परकीय सरकारांशी संबंध जोडण्याचे धोरण युधानंतर गादीवर आलेल्या पद्म समशेर राण्याने स्वीकारले व अमेरिकेबरोबर एप्रिल १९४७ मध्ये मैत्रीचा करार केला. हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांना हाताशी धरून भारतातही पाठिंबा मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

नेपाळी पुढारीही स्वस्थ बसले नव्हते. जानेवारी १९४७ मध्ये त्यांनी नेपाळी राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली, आणि संघटित चळवळीस लगेच सुरुवात झाली. विराटनगर येथील तागाच्या गिरणीत संप पुकारला गेला. १३ एप्रिल रोजी विराटनगर, वीरगंज, जनकपूर आणि खुद्द काठमांडूत मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह झाला. धावरून जाऊन पद्मसमशेरने सुधारणा सुचविल्या. नगरपालिका व जिल्हा मंडळे

यांच्या निवडणुका होतील आणि राष्ट्राचे अंदाजपत्रक प्रसिद्ध केले जाईल असे त्याने जाहीर केले. नाही तरी आतापर्यंत राष्ट्राचा सगळा पैसा राणा कुटुंबाच्या खिशातच गडप होत होता !

या आश्वासनांतर विसंबून सत्याग्रह थांबविला गेला. भारत सरकारने पाठविलेल्या सल्लागारांच्या साहाय्याने १९४८ मध्ये घटना तयार करण्यात आली. मात्र राणा कुटुंबाकडेच वंशपरंपरा पंतप्रधानपद कायम राहील, मंत्रीमंडळ पंतप्रधान निवडील आणि घटना स्थगित करण्याचे व त्यानंतर वटहुकूम काढण्याचे अधिकारही त्यालाच, अशा प्रकारच्या तरतुदी या घटनेत होत्या. तरीही या घटनेस राणा कुटुंबियांनी तीव्र विरोध केला आणि पद्मसमशेरने कंटाळून सेवानिवृत्ती पत्करली.

त्याचा धाकटा भाऊ मोहन समशेर आता पंतप्रधान झाला. पहिली गोष्ट म्हणजे त्याने नेपाळी राष्ट्रीय काँग्रेसवर बंदी घातली. परराष्ट्रांशी मैत्रीचे संबंध वाढविण्याचे त्याचेही धोरण होतेच. भारत सरकारलाही नेपाळ पूर्वीप्रमाणेच मदत देईल असे जाहीर करून हैद्राबाद चढाईच्या प्रसंगी दहा गुरखा बटॅलियन्स त्याने भारतात पाठविल्या. दिल्लीला भेट देऊन त्याने १९५० मध्ये भारताबरोबर मैत्रीचा करार केला. हा करार पुढे टीकेचा विषय होऊन बसला ती गोष्ट निराळी. मात्र १९४८ ची घटना राबविण्याचा त्याचा मुळीच उद्देश नाही हे हळूहळू प्रत्ययास येऊ लागले होते.

## क्रांतीची तुतारी

१९४८ मध्ये असंतुष्ट राण्यांनी नेपाळ प्रजातांत्रिक काँग्रेसची स्थापना केली. या राण्यांच्या संपत्तीचे पाठबळ तिला लाभले होते. त्याच जोरावर काँग्रेसचे पुढारी सुवर्ण आणि महावीर समशेर यांनी मुक्ती-सेनेची उभारणी चालविली. एप्रिल १९५० मध्ये नेपाळी राष्ट्रीय काँग्रेस आणि प्रजातांत्रिक काँग्रेस यांचे विलिनीकरण होऊन नेपाळी काँग्रेसचा जन्म झाला. नेपाळी क्रांतीची तुतारी फुंकली गेली. राजा त्रिभुवनचा या चळवळीस पाठिंबा असल्याचा सुगावा राण्याला लागून त्याने राजाकडे राज्यत्यागाची मागणी केली. पण राजपुत्र महेन्द्राने राज्यपद स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे तो प्रयत्न साध्य झाला नाही.

६ नोव्हेंबर रोजी राजा शिकारीसाठी सकाळी राजवाड्यातून बाहेर पडला. बरोबर राजपुत्र महेन्द्र आणि इतर कुटुंबीय मंडळी होती आणि पाठीमागे राण्याने नेमलेले शरीरसंरक्षक होते. भारतीय वकिलातीजवळ मोटारी येऊन पोचल्या मात्र वकिलातीची दारे एकदम उघडली आणि मोटारी आत घुसल्या. शरीरसंरक्षकांच्या लक्षात येण्याच्या आत दारे बंदही झाली. नेपाळच्या राजाने भारतीय वकिलातीत आश्रय घेतला होता. खास विमानाने त्याला लगोलग दिल्लीला आणण्यात आले.

मोहन समशेरने चिडून जाऊन राजाचा नातू ज्ञानेन्द्र यास गादीवर बसविले. पण या राजास भारतासकट सर्व राष्ट्रांनी मान्यता देण्याचे नाकारले.

राजा काठमांडूहून निसटला हे ऐकताच नेपाळी काँग्रेसने चढाईला एकदम सुरुवात केली. ट्रक भरभरून सनिक नेपाळ सरहद्दीवर जमले आणि या सहा स्वयंसेवकांनी वीरगंज जिंकले. विराटनगर आणि भैरवा येथे मात्र सरकारी सैन्याशी प्रखर सामना त्यास द्यावा लागला. काठमांडू येथेही प्रचंड निदर्शने झाली व गोळीबारात दोन माणसे मरण पावली. सरकारी सैनिकांची एक तुकडीच जेव्हा स्वयंसेवकांना जाऊन मिळाली तेव्हा राणा सरकारने आपले भवितव्य ओळखून वाटाघाटींना मान्यता दिली.

दिल्लीत भारत सरकारच्या मध्यस्थीने समझोता झाला आणि राणा सरकारने सार्वत्रिक निवडणुका घेण्यास व नवीन घटना तयार करण्यास मान्यता दिली. पण या वाटाघाटी झाल्या राजा व राणा यांच्या प्रतिनिधीमध्ये. नेपाळी काँग्रेसला त्यात सामील करून घेण्यात आले नव्हते ! त्यामुळे काँग्रेसच्या पुढाऱ्यांना हा समझोता मान्य होणे शक्य नव्हते. शेवटी कै. नेहरूंनी कोईराला बंधू वगैरे काँग्रेसी पुढाऱ्यांना दिल्लीला बोलावून त्यांचे मन वळविले व मुक्तिसेनेचे आंदोलन मागे घेण्यास त्यांना भाग पाडले. काँग्रेसमधील प्रखर राष्ट्रीय वृत्तीच्या पुढाऱ्यांचे मात्र समाधान झाले नाही आणि याचमुळे पुढे काँग्रेसमध्ये फूट पडली. १५ फेब्रुवारी १९५१ या दिवशी नेपाळी काँग्रेस पुढाऱ्यांसह राजा त्रिभुवन काठमांडूला परत आले. जनतेने या विजयी वीरांचे अभूतपूर्व स्वागत केले. विमानतळावर स्वागतास राणा मोहन समशेरही उपस्थित होता.

शंभर वर्षे नेपाळवर स्वामित्व गाजविणारे राणा कुटुंब अस्तंगत होत होते. नियंत्रित राजसत्तेचा जमाना सुरू होत होता. नवा मनू, नवी माणसे आणि नवीन कल्पना यांचा उदय होत होता. या कल्पनांची चेतावणी आणि या माणसांची कर्तबगारी हा कथाभाग पुढे यावयाचा आहे.

**(अपूर्ण)**

# महाभारतातील

भारतीय युद्धापूर्वीची ही गोष्ट आहे. सुईच्या अग्रावर राहील एवढी मातीही मी पांडवांना देणार नाही असे दुर्योधनाने एक पत्रक काढून जाहीर केले. वाटाघाटी फिसकटल्या, पांडवांनी कौरवांचा पुष्कळ अनुनय करून पाहिला. राज्य आमचे झाले तरी तुमच्यावर कदापि अन्याय होऊ देणार नाही याची हमी दिली. पण कौरवांचे एकच उत्तर—

"तुमच्या राज्यात आम्हाला कधीही सुरक्षितता वाटणार नाही."

दोन्ही पक्ष अटीतटीला पेटले.

आता युद्ध होणार की काय अशी भीती म्हाताऱ्या माणसांना वाटू लागली. धर्मराज तर प्रत्यक्ष शांतीचा पुतळा. तो तर पहिल्यापासूनच अस्वस्थ होता. काय वाटेल ते करा, पण हे भांडण मिटवा अशी इच्छा त्याने व्यक्त केली.

शेवटी सगळ्या म्हाताऱ्या लोकांच्या आग्रहावरुन भगवान श्रीकृष्ण शिष्टाईसाठी निघाले.

शिष्टाईच्या प्रसंगी पांडवांची बाजू कशी मांडावी, कौरवांना कोणकोणत्या सवलती द्याव्यात इत्यादी सर्व मुद्यांचा खल झाला. या चर्चेत श्रीकृष्णाने काहीच भाग घेतला नाही. ठरल्याप्रमाणे ते शिष्टाइसाठी निघाले. वाटेतच सती द्रौपदी आपल्या बंधुराजास भेटण्यासाठी आली.

श्रीकृष्णाची भेट झाल्याबरोबर मुक्तकेशा द्रौपदी संतापाने थरथरत म्हणाली, "दादा, तू तडजोड करणार काय ? मग माझ्या अपमानाची भरपाई कशी होईल ? अन्यायावर अन्याय करणाऱ्या कौरवांशी कधीतरी कायमचा संधी होऊ शकेल काय ?"

# एकात्मता परिषद

श्रीकृष्ण स्मित हास्य करून म्हणाले,

" हे द्रुपदकन्ये, कौरवांशी तडजोड अशक्य आहे हे मी जाणतो. कौरव मुळचेच आक्रमक प्रवृत्तीचे आहेत. पांडवांविषयी त्यांना मनातून कसलेही प्रेम नाही. पण चार लोकांच्या आग्रहासाठी, जगात आपल्याला कुणी नावं ठेवू नयेत म्हणून वाटाघाटी करणं भागच आहे, वाटाघाटी नावाचा दरवाजा असा आहे की ज्याची दारं नेहमी उघडीच ठेवावी लागतात."

" मग माझ्या अपमानाचं काय? तडजोड झाली तर ती आपल्यालाच हानिकारक होणार हे निश्चित." द्रौपदी चिडून म्हणाली. " दुष्टांचे पारिपत्य होणारच नाही काय ?"

श्रीकृष्ण शांतपणे म्हणाला,

" मी जरी वाटाघाटींसाठी चाललो तरी या वाटाघाटी यशस्वी होणार नाहीत याची काळजी घेईन, म्हणजे तर झाले ?

" पण कसं ? तू काय युक्ती काढणार ?"

श्रीकृष्ण विचारात गढले. राजनीतीज्ञांचा मेरूमणी म्हणून ज्याची ख्याती त्या श्रीकृष्णालादेखील नेमका मार्ग ठाऊक नव्हता. त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. क्षण दोन क्षण त्यांनी डोळे मिटले. मग एकाएकी त्यांची मुद्रा प्रफुल्लित झाली.

" सापडला, मार्ग सापडला—ते चुटकी वाजवून ओरडले, " द्रौपदी, तू आता कसलीच चिंता करू नकोस, कौरव–पांडवांचा समेट होऊ नये यासाठी एक प्रभावी मार्ग मला सापडला आहे......!"

" तो कोणता ?"

" एकात्मता परिषद. "

" कसली परिषद ?" द्रौपदीला आश्चर्य वाटले.

कौरव–पांडव एकात्मता परिषद. " श्रीकृष्ण स्वतःशीच बोलल्याप्रमाणे बोलले, " कौरव–पांडवांची एकी घडवून आणण्यासाठी दोन्ही पक्षांच्या ठळक मंडळींना एकत्र बोलावून चर्चा करायची. हिलाच ' एकात्मता परिषद ' असं नाव आहे. "

" मग यातून आपल्याला पाहिजे ते कसं घडून येईल ?"

" बरोबर घडेल. ' परिषद ' या संस्थेचं महात्म्यच तसं आहे. साधारणपणे एखाद्या थंड हवेच्या ठिकाणी ही परिषद बोलवायची. म्हणजे उपस्थिती बरी राहते. शिवाय थंड हवेत चर्चेला जोर येतो. संख्या जास्त आणि चर्चाही भरपूर, त्यामुळे कोणत्याच मुद्यावर एकमत होत नाही. पण परिषद ही यशस्वी झाली असं दाखवावंच लागतं. म्हणून सर्वमान्य असं एक पत्रक मागाहून काढतात. त्या पत्रकाचा अर्थ जो तो आपल्या सोयीनुसार लावतो. त्यामुळं जास्तच भांडणं सुरू होतात. तडजोडीची थोडी जरी आशा असेल तर तीही खलास होते. कौरव–पांडवांची लढाई व्हावी असं वाटत असेल तर त्याला आता हाच उपाय दिसतो. "

द्रौपदीने संमती दिली आणि श्रीकृष्णांनी नंतर लगेच एकात्मता परिषद भरवली. श्रीकृष्णाची ही यक्ती सफल व्हायला काय उशीर ? ग्रीष्म ऋतूचे दिवस आणि थंड वायूमानाचे ठिकाण. शंभर कौरव, पाच पांडव इतकेच नव्हे तर ज्यांचा काही संबंध नाही असे इतर राज्यातले राजे–राजपुत्रही या परिषदेला आले. सगळ्यांनी एके ठिकाणी बसून खूप भांडणे केली, वाद-विवाद रंगले, एकमेकांवर आरोप–प्रत्यारोप झाले. पूर्वीचे मतभेद अधिकच वाढले. अखेर एक पत्रक काढून परिषद यशस्वी झाल्याचे जाहीर करण्यात आले.


सर्वांना आनंदी आनंद वाटला.

......आणि मग लवकरच पुढे भारतीय युद्ध झाले !

त्याचा इतिहास सर्वांना माहीत आहेच.

तात्पर्य – ' परिषद ' नावाची वस्तू राजकारणात फार उपयोगी असते. तिचा उपयोग पाहिजे तसा होऊ शकतो. म्हणून शहाण्याने तिचा कधीही अव्हेर करू नये ! ○

द. मा. पुराणिक



चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन

पुणे

# रूपवती भार्या शत्रू:!

*भर दुपारी पलविंदर कौरच्या दारात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याची गाडी थांबली. मालकिणीच्या गैरहजेरीत घरातल्या मोलकरणीनं जे जे सांगितलं त्यावरून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनात खुनी इसमाचा आकार तयार होवू लागला. पहिलं पाऊल म्हणून त्यांनी पलविंदर आणि मोहिंदरपाल यांच्या नावे वॉरंट्स् काढली.*

४ | | | | | | | | | ॲड. माधव कानिटकर

रात्रीचे किती वाजले होते कुणास ठाऊक ? अनेक प्रयत्न करूनदेखील पलविंदरकौरला झोप लागत नव्हती ! आता रेडिओवर कुठलाही कार्यक्रम नव्हता, वाचन करायची तिची मन:स्थिती नव्हती, डोळे मिटून पडून राहूनदेखील झोप लागत नव्हती, तिने अनेकदा कूस बदलली. गेल्या अनेक दिवसात मोहिंदरपालसिंग फिरकला नव्हता. जांभया देऊन, कानोसा घेऊन ती कंटाळली होती. अलिकडे दररोज हे असंच होत होतं ! उद्या सकाळी डॉक्टरकडे जाऊन मिळाल्यास झोपेच्या गोळ्या घेऊन ठेवाव्यात असा विचार तिच्या मनात आला, तोच बाहेरच्या शांततेचा भंग करणारा एक विचित्र घरघराट तिला ऐकू येऊ लागला. झटकन उठून तिने खिडकीचा पडदा दूर सारला. प्रकाशाचे दोन झोत तिच्याच दिशेने फार वेगाने जवळ येत होते ! बघता बघता ती व्हॅन सरळ पलविंदरकौरच्या बंगल्याच्या आवारात घुसली ! पोलीस व्हॅन ! प्रकाशाचा झोत क्षणात तिच्या अंगावरून सरकला आणि व्हॅन पोर्चमध्ये येऊन थांबली ! पलविंदरकौरच्या हातापायांना घाम फुटला ! एक बडा इन्स्पेक्टर आणि १०–१२ कॉन्स्टेबल्स सरळ पायऱ्या चढून वर येत होते ! दरवाजा ठोकल्याचा आवाज आला. नोकरचाकरांनी पोलिसांना नुसतं पाहूनच घाबरून दरवाजा उघडला. एका पाठोपाठ एक आतले दिवे लावले गेले आणि दुसऱ्याच क्षणी तिच्या बेडरूमची कडी खडखडली ! नाईट गाऊन सारखा करीत तिने दिवा लावला आणि कडी काढली. हातातली बॅटरी दांडक्यासारखी हलवून वरिष्ठ अधिकाऱ्याने ५–६



**‘ माझे माझ्या पतीवर फार प्रेम होते. मी खून केला नाही.’ पर्लविंदर बोलू लागली.**

कॉन्स्टेबल्सना बेडरूममध्ये घुसण्याचा इशारा केला. आणि बघता बघता त्या कॉन्स्टेबलसनी तिचे कपाट उघडले ! ट्रंका पुढे ओढल्या ! गाद्या विस्कटल्या ! पर्लविंदरकौरने बाहेर व्हरांड्यात डोकावून पाहिले. बंगल्याच्या बाकीच्या खोल्यांतूनदेखील पोलिसांचा तोच ‘उद्योग’ चालू होता ! असहाय्य नजरेने तिने वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाहिले आणि त्यांनी करड्या आवाजात तिला सुनावले, “ पर्लविंदरकौर ! आपले यजमान जसपालसिंग यांचा खून केल्याच्या आरोपावरून मी तुला अटक करतो आहे ! ”

“ मला एक फोन करायचा आहे ! ”

“ काही उपयोग नाही ! आम्हीच जाऊन आलो मोहिंदरपालकडे ! तो घरी नाही ! ”

वरिष्ठ अधिकाऱ्याच्या या खोचक वाक्याने पर्लविंदरकौर चरमली आणि तिने मान खाली घातली. तिच्या बाजूला एक कॉन्स्टेबल उभा ठेवून अधिकारी आत घुसला. बेडरूमची त्याने काळजीपूर्वक झडती घेतली. मोहिंदरपालसिंग बेडरूममध्ये नव्हता ! त्या शयनगृहातली जवळ जवळ प्रत्येक वस्तू उलटीपालटी करून

खोलीच्या मध्यावर टाकली जात होती आणि त्या ढिगाऱ्याजवळ बसून वरिष्ठ अधिकारी त्यांची छाननी करीत होता. अजून तरी पर्लविंदरकौर व मोहिंदरपाल यांचा एकत्र फोटो किंवा प्रेमपत्रे यांपैकी काहीच मिळाले नव्हते. असल्या 'चिजा' आपल्याच बेडरूममध्ये ठेवण्याइतकी पर्लविंदरकौर मूर्ख नव्हती ! निराश न होता कागदाचा प्रत्येक कपटादेखील वरिष्ठ अधिकारी वाचून पाहत होता......आणि ......आणि अचानक त्यांच्या हातात एक तांबड्या रंगाचा कॅश-मेमो आला ! ते बिल होते मोहिंदरपालसिंगाच्या नावावर, सापडले होते पर्लविंदरकौरच्या बेडरूम-मध्ये आणि त्या बिलाप्रमाणे आणली गेलेली वस्तू होती पोटॅशियम सायनाईड !... आणि त्या बिलावरची तारीख ती होती की ज्या तारखेनंतर जसपालसिंग कुणालाही कुठेही दिसला नव्हता.... दिसणार नव्हता !

तो महत्त्वाचा पुरावा पंचासमक्ष जमा करून घेऊन व पर्लविंदरकौरला ताब्यात घेऊन वरिष्ठ अधिकारी पोर्चच्या पायऱ्या उतरले. बंगल्याच्या आजूबाजूने काळो-खात उभे करून ठेवलेल्या हवालदारांनी पुढे येऊन खडाखड सलाम ठोकले आणि "बंगल्यातून कोणीही कुठल्याही मार्गाने बाहेर पडलेला नाही !" असा रिपोर्ट दिला, तेव्हा कुठे पर्लविंदरकौरला प्रथम कळले की वरिष्ठ अधिकारी काय तयारी-निशी आला होता !

......दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात पहिल्याच पानावर ठळक अक्षरात मथळे झळकले :

"ट्रंकेतल्या प्रेताचे रहस्य उलगडले !"

"पतीच्या खुनाबद्दल पत्नीस मध्यरात्री अटक !"

"विवाहित प्रेयसी कोठडीत आणि प्रियकरावर वॉरंट !"

या बाबतीत असे समजते की ......."

आवश्यक तो सर्व तपशील वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला ! आणि जहागिरदार रूपसिंग ढळढळा रडले ! खानदानी घराण्यातील सुशिक्षित आणि सुंदर सून त्यांनी शोधून आणली होती ! .... की जिने सासरमाहेरच्या दोन्ही कुळांचे खानदान बुडविले होते ! मुलगा तर गेलाच होता.. आज अब्रूही गेली ! जी अब्रू त्यांनी आयुष्यभर जपली, सांभाळली ती सुनेने एका दिवसात घालविली !

......पोलीस स्टेशनवर आल्यावर काही विचारण्यापूर्वीच पर्लविंदरकौरने शांत-पणे सांगितले होते की, "माझा कबुलीजबाब लिहून घ्या !"

......तिच्या या पवित्र्यामुळे वरिष्ठ अधिकारी स्वतःच अडचणीत आला ! त्यांना ठाऊक होते की खुनासारख्या महत्त्वाच्या खटल्यात आरोपीने पोलीस स्टेशनवर दिलेल्या कबुलीजबाबाला कोर्ट कवडीची किंमत देणार नाही ! पुष्कळ वेळा आरोपीने खरोखरच गुन्हा केलेला असतो. पोलीस स्टेशनवर तो गुन्हा कबूल करतो ! जामिनावर सुटतो ! आणि केस कोर्टापुढे आली, की मॅजिस्ट्रेट साहेबांना

सरळ सांगतो की, " मला गुन्हा मंजूर नाही ! मी कबुलीजबाब देत नव्हती ! पण पोलिसांनी मला मारहाण करून जबरदस्तीने तो लिहून घेतला !" पुरावा कमी पडला तर गुन्हेगार निर्दोष (!) सुटतो ! गुन्ह्याचा कबुलीजबाब नेहमी मॅजिस्ट्रेटपुढे झाला तर तो खरा आणि ग्राह्य मानला जातो. काहीही न बोलता वरिष्ठ अधिकाऱ्याने पर्लविंदरकौरची खास कोठडीत रवानगी केली !

१५ एप्रिल १९५० हा दिवस जसपालसिंग खून खटल्यात अत्यंत महत्त्वाचा ठरला ! डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात पर्लविंदरकौरला हजर करण्यात आले. कोर्टात आणि कोर्टाबाहेर तोबा गर्दी उसळली होती ! बरोबर ११ वाजता मॅजिस्ट्रेटसाहेब न्यायासनावर बसले. पोलिसांची धावपळ सुरू झाली. त्यांनी मोठ्या आवाजात उच्चारलेले, "सायलेऽऽऽन्स !" "चुऽऽप !" हे शब्द देखील कुणाला ऐकू येत नव्हते ! आरोपी पर्लविंदरकौरचे नाव पुकारले गेले तशी वरिष्ठ अधिकारी पिंजऱ्यात शिरले. मॅजिस्ट्रेटसाहेबांना त्यांनी एक कडक सलाम ठोकला. सरकारी वकिलांच्या कानाशी ते काहीतरी कुजबुजले. सरकारी वकिलांचे आणि मॅजिस्ट्रेट साहेबांचे काय बोलणे झाले कुणास ठाऊक ? पर्लविंदकौरचे नाव पुकारले गेले आणि डौलदार सौंदर्याची ती पुतळी आरोपीच्या पिंजऱ्याजवळ येऊन शांतपणे उभी राहिली ! मॅजिस्ट्रेट साहेबांनी अत्यंत शांतपणे लोकांना कोर्टाबाहेर जाण्याचा हुकूम दिला ! शिरस्तेदारांनी उभे राहून मोठ्या आवाजात तो हुकूम लोकांना सुनावला, " चालू केस का लोग छोड के बाकी सब लोग बाहर जाव !"

लाकडी दंडुके घेऊन पोलीस पुढे सरसावले आणि बघता बघता कोर्ट रिकामे झाले ! कोर्टाचे काचेचे दरवाजे धडाधड लावले गेले आणि आतल्या एकांतात (In-Camera) पर्लविंदकौर लाकडी पिंजऱ्यात शिरलेली दिसली ! ऐकायला काहीच येत नव्हते. स्वतः मॅजिस्ट्रेट साहेब, सरकारी वकील, वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि बंदोबस्ताचे एक–दोन कॉन्स्टेबलस् इतक्या मोजक्या लोकांनाच तिचा मंजूळ आवाज ऐकण्याचे भाग्य लाभले ! पर्लविंदकौर ' कबुली जबाब ' देत होती ! आणि मॅजिस्ट्रेट लिहून घेत होते......

"...... माझे पती जसपालसिंग यांना शिकारीचा आणि फोटोग्राफीचा नाद होता. नक्की दिवस आठवत नाही. पण महिना मात्र आठवतो ! डिसेंबर १९४९ मध्ये माझ्या पतीने माझा आतेभाऊ मोहिंदरपालसिंग याला फोटो डेव्हलप करण्यासाठी पोटॅशियम सायनाईड आणायला सांगितले. ती पोटॅशियम सायनाईडची बाटली माझ्या भावाने माझ्याजवळ आणून दिली आणि मी ती बाटली औषधांच्या कपाटात ठेवली ! ...... पुढे मी ही गोष्ट विसरून-देखील गेले......त्यानंतर काही दिवसांनी माझे पती शिकारीसाठी टूर-वर गेले. आठवड्यानंतर ते आले त्या वेळी मी व्हरांड्यात बसले होते. आपल्याला डायरिआ झाल्याची त्यांनी माझ्याजवळ तक्रार केली. शिकारीला गेले की, त्यांचं

खाणं बेसुमार होत असे आणि परत आल्यावर त्यांना नेहमीच या विकाराचा त्रास होत असे. घाईघाईत बंदूक कोपऱ्यात ठेवून त्यांनी मला त्यांचे नहमीचे औषध कुठाय म्हणून विचारले आणि मी त्यांना ते औषधांच्या कपाटात नेहमीच्या ठिकाणी असल्याचे सांगितले. ते आत गेले आणि ३–४ मिनिटांत माझा धाकटा मुलगा धावत बाहेर आला. माझा हात ओढीत तो म्हणाला, ' आई ! बाबा पडले ! ते बघ कसं करताहेत ते ! ' मी धावत आत गेले ! ' हे ' जमिनीवर पडून अक्षरशः तडफडत होते. पाणी आणण्यासाठी मी आत गेले आणि मी बाहेर येण्यापूर्वीच त्यांची हालचाल बंद पडली ! नेहमीचे औषध समजून चुकून ते पोटॅशियम सायनाईडची बाटली प्यायले ! ...मी मोहिंदरपालला बोलवून घेतले, तो म्हणाला ' ताबडतोब हा प्रकार सरदार रूपसिंगांना-माझ्या मामंजींना–कळवला पाहिजे ! पण सरदार रूपसिंगांचे माझ्याशी वितुष्ट होते. त्यांच्या भीतीने मी त्यांना काहीच न कळवायचे ठरवले. मी गांगरले होते ! मला काही सुचेना ! मनाच्या अशा अवस्थेत आम्ही ते प्रेत एका ट्रंकेत कोंबले ! ती ट्रंक ४–५ दिवस घरातच होती ! नंतर ती आम्ही कॅंपात स्टोअर रूममध्ये हलविली ! तिथे ती ८–१० दिवस होती ! आणि त्यानंतर मोहिंदरपालसिंगच्या मदतीने ती ट्रंक जीपमध्ये घालून छाट खेड्यापासून दूरवर असलेल्या ओसाड विहिरीत टाकून दिली ! माझा गुन्हा काय असेल तर तो इतकाच ! माझे माझ्या पतीवर फार फार प्रेम होते. मी त्यांचा खून केला नाही. चुकून पोटॅशियम सायनाईड घेतल्यामुळे त्यांना अपघाती मरण आले ... मला वाटतं हा प्रकार १९५० च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात घडला असावा. "

पर्लविंदर कौरचा ' कबुली जबाब (!)' हा असा होता ! तिचा जबाव तिला मॅजिस्ट्रेट साहेबांनी वाचून दाखवला व तो बरोबर आहे अशा अर्थाची तिने मान हलवल्यावर तिची त्यावर सही घेतली गेली.

......मोहिंदरपालसिंगला अजून अटक व्हायची होती. तो कुठे आहे हे फक्त पर्लविंदर कौरच सांगू शकली असती. वरिष्ठ अधिकाऱ्याने कोर्टाला विनंती केली, की पर्लविंदर कौरला जामिनावर मुक्त करू नये ! अधिक चौकशी साठी कोर्टाने आणखी १४ दिवसांचा अवधी दिला आणि शिपाई जरूर नसताना नेहमीच्या सवयी प्रमाणे ओरडला, " २९ एप्रिल, पोलीस कस्टडी !" कडक बंदोबस्तात आरोपी पर्लविंदर कौरला कोर्टाबाहेर नेण्यात आले !

......जसपालसिंग खून खटल्याची चौकशी आता फारशी राहिलेली नाही. मोहिंदरपाल सिंगला अटक झाली की, ताबडतोब आरोपपत्रक सादर करून (charge-sheet) आरोपी नं १ मोहिंदरपालसिंग आणि आरोपी नं. २ पर्लविंदर-कौर यांच्यावर जसपालसिंगाचा जाणून बुजून खून करणे व खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने त्याचे प्रेत विहिरीत टाकणे या इं. पि. को. कलम ३०२ व २०१

खाली दोघांच्यावर खटला सुरू करता येईल असा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा अंदाज होता ! ......आणि त्यांचा तो गैरसमज हळूहळू दूर होत होता !

......सतत आठ दिवस वेगवेगळे प्रश्न विचारूनदेखील पर्लविंदर कौर, मोहिंदरपालसिंगाचा पत्ता सांगतच नव्हती. प्रत्येक वेळी ती रडत होती आणि रडत रडता सांगत होती, "का मला उगाच छळता ? मोहिंदरपालसिंग कुठे आहे ते मी कसं सांगू ? खरोखरच त्याचा पत्ता मला ठाऊक नाही. जाताना तो मला सांगून गेला नाही."

......आत्तादेखील तिचे ते ठराविक उत्तर ऐकून वरिष्ठ अधिकारी मनातल्या मनात संतापला. त्याच्या मनात विचार येऊन गेला की "ही बाई जितकी देखणी आहे तितकीच बदमाश आहे ! हिच्या ठिकाणी कुणी पुरुष पाहिजे होता ! मरे मरेस्तोवर बडवला असता. ! चार दांडके खाल्ल्यावर बरोबर पत्ता बाहेर पडला असता ! पण हिच्या बाबतीत तेही करता येत नाही !" तिला परत कोठडीत बंद करून वरिष्ठ अधिकारी टेलिफोनजवळ आले. मोहिंदरपालसिंगचे वर्णन त्यांनी पंजाबमधल्या कानाकोपऱ्यातल्या पोलिस स्टेशनवर कळवले होते आणि असा इसम आढळला तर त्याला ताबडतोब अटक करा म्हणून सक्त हुकूम दिला होता. टेलिफोनवरून त्यांनी अनेक प्रमुख पोलिस स्टेशन्सशी, तुरुंगाधिकाऱ्यांशी, हॉस्पिटलस्सशी संपर्क साधला. प्रत्येक ठिकाणाहून उलट जबाब आला की, "मोहिंदरपालसिंग नावाच्या किंवा त्याच्या वर्णनाच्या कुठल्याही इसमाला अजून अटक झालेली नाही—तसा इसम इथे नाही !" मोहिंदरपालसिंग जन्माला आल्यापासून फरारी होईपर्यंत तो जिथे जिथे गेला त्या प्रत्येक ठिकाणी गुप्त पोलिसांचा कडक पहारा होता ! मात्र प्रत्येक ठिकाणाहून 'रिपोर्ट' येत होता "मोहिंदरपालसिंग अजून सापडलेला नाही !"

वरिष्ठ पोलीस अधिकारी कात्रीत सापडले होते. मोहिंदरपालसिंग त्यांना मिळत नव्हता. प्रत्येक वेळेला कोर्टाकडून अवधी मागून घ्यायची त्यांना लाज वाटत होती. तशातच लोक हळूहळू कुजबूज करू लागले होते की, किती झालं तरी पर्लविंदर कौर एका बड्या पोलीस अधिकाऱ्याची मुलगी, एके काळचे पंजाबचे महसूलमंत्री श्री. ××× यांची नातलग ! सरकार हा खटला दाबून टाकणार ! ही कुजबूज पंजाबातल्या प्रमुख वृत्तपत्रे आणि साप्ताहिकांच्या, मासिकांच्या संपादकांच्या कानापर्यंत पोचली आणि ते सर्व खवळून उठले. संपादकीय लेखण्या बोचक आणि खोचक टीका करू लागल्या ! ते वाचून पुन्हा लोक खवळले ! पंजाबच्या विधान सभेत जसपालसिंग खून खटल्याच्या कामकाजाच्या पद्धतीबाबत प्रश्नोत्तरांच्या फैरी झडल्या ! गृहमंत्र्यांनी ठराविक उत्तर दिले, "भावना भडकवू नका ! चौकशी चालू आहे. त्याचा तपशील आत्ताच देणं हे चौकशीच्या दृष्टीनं हिताचं नाही !"

संपादक पुन्हा भडकले. कुचेष्टा सुरू झाली. जसपालसिंग खून खटल्याच्या

'चौकशी'चीच त्यांनी सारखी चौकशी सुरू केली ! आतादेखील एका साप्ताहिकातील ओरखाडे काढणारे 'विनोद' वरिष्ठ अधिकारी असहाय्यपणे वाचीत होता. आतल्या आत संतापत होता !

"बाबा ऽऽऽ !"

"बोल बेटा ऽऽ !"

"वरिष्ठ पोलिस अधिकारी म्हणजे कोण हो ?"

"बेटा ऽऽ ! महत्त्वाच्या खून खटल्याची चौकशी करायला ज्याला अनेक महिने लागतात आणि तरीदेखील मुख्य आरोपीला ज्याला पकडता येत नाही त्याला म्हणतात वरिष्ठ पोलिस अधिकारी !"

वरिष्ठ अधिकाऱ्यांना पुढे वाचवेना ! रागाने त्यांनी ते साप्ताहिक फेकून दिले ! आणि त्यांची असहाय्य परिस्थिती, त्यांच्या आजवरच्या चौकशीचा अहवाल आणि कष्ट त्यांनी त्यांच्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या इन्स्पेक्टर जनरलला कळविले ! चौकशीचे काम मोहिंदरपालसिंगच्या अटकेच्या अभावी बेमुदत रेंगाळण्याची शक्यता निर्माण झाली होती. न जाणो, मोहिंदरपाल कदाचित पाकिस्तानात पळून गेला असेल ! वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अहवाल इन्स्पेक्टर जनरलने नीट वाचला. त्यांची खात्री पटली की, मोहिंदरपालसिंगला पकडण्याच्या बाबतीत सर्व प्रामाणिक प्रयत्न अधिकाऱ्याने केलेले आहेत. इन्स्पेक्टर जनरलने सरकारी वकिलांना या बाबतीत सल्ला विचारला. सरकारी वकिलाने मत दिले, "मोहिंदरपालसिंगावर खुनाचा खटला भरण्याच्या तुमच्या अधिकाराला बाध न आणता, तुम्ही एकट्या पर्लविंदरकौरवरदेखील खटला भरू शकता !" वरिष्ठ अधिकाऱ्याला ताबडतोब 'वरून' हुकूम आला, मोहिंदरपालसिंग हा पोलिसांना हवा असलेला गुन्हेगार म्हणून जाहीर करा आणि पर्लविंदरकौरवर पतीच्या खुनाचा आरोप ठेवून खून-खटला ताबडतोब चालू करा ! प्राप्त परिस्थितीत दुसरे काहीच करता येत नव्हते !

डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी आरोपी पर्लविंदरकौरला आरोप पत्रकाची नक्कल (charge-sheet) दिली गेली आहे की नाही, याची खात्री पटवून घेतली आणि प्राथमिक पुरावा तपासून पाहिला. आपले पती जसपालसिंग यांचा जाणून बुजून आणि हेतू पुरःस्सर खून करून नंतर खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने पतीच्या प्रेताची विल्हेवाट लावून इं. पि. को. च्या कलम ३०२ आणि २०१ यांच्या कक्षेत येणारे गुन्हे केले, असा आरोप पर्लविंदर कौरवर ठेवण्यात आला !.... पर्लविंदरकौरने आरोप नाकबूल केले ! मॅजिस्ट्रेटसाहेबांनी साक्षीदारांच्या जबान्या नीट वाचल्या. त्यांच्याच समोर तिने दिलेला 'कबुली जबाब' त्यांना बऱ्याच विसंगतींनी भरलेला, चमत्कारिक व पूर्वनियोजित वाटला ! तो संपूर्ण खरा नव्हता आणि संपूर्ण खोटा नव्हता ! जसपालच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याची तिची कबुली खरी होती ! तो प्रकार प्रत्यक्ष पाहणारे अनेक साक्षी आरोपपत्रकात

होत्या. त्या जबान्या तिच्या म्हणण्याला पूरक (supporting) होत्या. मात्र आपल्या त्याच कबुली जबाबात (!) तिने खुनाचा आरोप नामंजूर केला होता! तिचा बचाव असा होता की, जसपालसिंग 'चुकून' पोटॅशियम सायनाईड प्याल्यामुळे अपघाताने मेला! हा बचाव कितपत खरा किंवा योग्य आहे, हे पाहण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटसाहेबांचा नव्हता. मात्र त्यांची खात्री पटली की, खुनाचा आरोप ठेवण्याइतपत सकृद्दर्शनी (Prima facie) भरपूर पुरावा पुढे आलेला आहे! मॅजिस्ट्रेटसाहेबांनी टायपिस्टला बोलावला आणि कमिटल ऑर्डर डिक्टेट केली!

पंजाबमधली सायंकाळची वृत्तपत्रे तडाखेबंद संपली! पहिल्याच पानावर पलविंदरकौरचा लोभस चेहरा आणि बाजूला ४ कॉलमी जाड–जूड मथळे "जसपालसिंग खून–खटला सेशन कमिट झाला!"

मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या योग्य निर्णयामुळे पलविंदरकौर मनातून हबकली! आधीच सडपातळ असलेली तिची रूपसंपदा आता 'कृश' भासली! तजेलदार केतकी रंग पांढरा फटक पडला! तिच्या कमनीय भृकुटींच्या खाली असलेले डोळे पाणीदार आहेत की, त्या डोळ्यांत पाणी आहे, याचा निर्णय होत नव्हता! बाहेरून मात्र ती कमालीची संयमी आणि शांत होती! कोर्टातदेखील तिच्याकडे पाहणाऱ्या काही जणांना ती 'निष्पाप' आहे, असं नुसतं पाहूनच वाटत होतं! इतक्या वेळा तिला कोर्टात आणली गेली होती, परत कस्टडीत नेली गेली होती, पण त्या प्रत्येक वेळी तिचे मुग्ध सौंदर्य अधिकाधिक खुलले होते! हळवे लोक तिचा चेहरा बघून मनातल्या मनात म्हणत होते, 'छे! छे! इतकी छान बाई खून करणं शक्य नाही.' त्याचबरोबर असल्या 'छान' बायांना, त्यांच्या 'उद्योगां'ना नेहमी पाहणारे लोक म्हणत होते, 'अरे, असल्याच बाया हे धंदे करतात! काही नाही, लटकवली पाहिजे × × ला!"

खटला वर्ग करून मॅजिस्ट्रेटसाहेब उठून गेले! आरोपीच्या पिंजऱ्यातून पलविंदरकौर अडखळत खाली उतरली. कडक पोलिस बंदोबस्तात तिला कोर्टाच्या मागे उभ्या करून ठेवलेल्या जीपमध्ये अक्षरशः चढविण्यात आलं! मागे लोकांचा घोळका येतच होता! जीपच्या आजूबाजूला बघ्यांची प्रचंड गर्दी अगोदरच होती! त्या गर्दीकडे पाहून पलविंदरकौरला दुःखाचा कढ आला! आपले भवितव्य कठीण आहे याची तिला स्पष्ट जाणीव झाली! फाशीचा दोर घड्याळाच्या लंबकासारखा तिच्या डोळ्यांपुढे हलू लागला! तिला भेडसावू लागला! दोन्ही हातांच्या नाजूक लांबसडक बोटांनी तिने आपला चेहरा झाकून घेतला...आणि ती ढसढसा रडू लागली!

कोणी तरी निर्धाराने जीपचा मागचा दरवाजा बंद केला आणि अंबाल्याच्या सेशन्स कोर्टाच्या दिशेने ती जीप धावू लागली......

(अपूर्ण)

# भिंतीच्या टेंबड्या

सुधाकर राजे

## □ राजकीय पार्श्वगायन

पाठीमागे राहून कारवाया करणाऱ्या एका पक्षाला दुसऱ्या एका पक्षातल्या माणसाने " लता मंगेशकर पक्ष " अशी शिवी हासडल्याचे थोड्या दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांत वाचले. बिचाऱ्या लताबाई ! पडद्यावर आपली पतली कमरिया उगीचच लचकावीत तोंडाची उघड-झाप करणाऱ्या डझनावारी नायिकांना त्यांनी आपला गोड गळा उसना दिला यात त्यांनी करवाई ती काय केली ? खरे म्हणजे भारतात बदसूर राजकारण पाहिले की मला वाटते त्याला सुरेल करण्यासाठी एखाद्या लता मंगेशकर पक्षाचीच खरी आवश्यकता आहे. या पक्षाच्या जाहीर-नाम्यात पुढील कलमे ठेवायला हरकत नाही.

पक्षाच्या प्रत्येक पुढाऱ्याने लयबद्ध भाषण करायला शिकले पाहिजे. इतर पक्षांतील पुढाऱ्यांची भाषणे ऐकताना श्रोत्यांना झोप लागायला वेळ लागतो, तशी अडचण आपल्या भाषणात होता कामा नये.

देशातला राजकीय गोंगाट कमी व्हावा म्हणून पक्षाच्या प्रत्येक पुढाऱ्याने गाता न येणाऱ्या नायिकेप्रमाणे तोंडाची उघड-झाप करायला शिकले पाहिजे.

राजकीय भाषणे ही पुष्कळ वेळा सिनेमातल्या गाण्यांइतकीच अर्थहीन असतात. तेव्हा त्यांची अर्थहीनता लपविण्यासाठी सिनेमाप्रमाणेच ऑर्केस्ट्रा ठेवावा.

कुठल्याही फिल्मी गाण्याची लोकप्रियता त्याच्या चालीवर अवलंबून असते. तेव्हा पक्षाच्या पुढाऱ्यांनी लोकप्रियता मिळविण्यासाठी नीट चालायला शिकावे. निवडणुकीच्या शर्यतीत शर्यतीच्या घोड्याप्रमाणे धावता यायच्या आधी नीट चालता येणे आवश्यक आहे.

या सर्व लौकिक सूचना फक्त पुढाऱ्यांना उद्देशून आहेत याचे कारण उघड आहे, हिंदुस्थानातील राजकीय पक्षांत फक्त पुढारी असतात, अनुयायी नसतात.

## □ कॉम्प्यूटरची अभिरुची

दुसऱ्याला नावे ठेवण्याइतकी सोपी गोष्ट या जगात दुसरी नाही. पण आपल्या मलाला चांगले नांव ठेवणे मात्र तेवढेच अवघड आहे असा अनुभव जगातल्या सर्व आई-बापांना येतो. रशियात तर त्याच त्याच नावांना कंटाळलेल्या मंडळींनी म्हणे अशी सूचना केली आहे की नवीन जन्माला आलेल्या मुलांसाठी नवीन नावे शोधून काढायचे काम कॉम्प्यूटरवर सोपवावे. आता हा कॉम्प्यूटर करणार तरी काय काय

आहे ? परराष्ट्रीय धोरण ठरविणार की नवकाव्य करणार, की लग्ने जमविणार की नाते ठेवणार ? आणि नवकाव्य करायला सवकलेल्या कॉंप्यूटरच्या अभिरूचीची कोणी हमी द्यायची ? उलट एखाद्या प्रेमळ कॉम्प्यूटरला एखाद्या गोजिरवाण्या बाळाचे नाव ठेवायला जागाच दिसली नाही तर ? ते काही असो, आपण माणसे कॉंप्यूटरवर इतक्या जबाबदाऱ्या टाकू लागलो आहोत कीं जगाचा कारभार नीट चालविण्यासाठी कॉंप्यूटर व परमेश्वर अशी पार्टनरशिप फर्म निघाली तरच तरणोपाय दिसतो.

## ☐ अज्ञानातला क्रमिक आनंद

अज्ञानात किती आनंद भरलेला आहे याची सज्ञान माणसाला कल्पना येणे कठीण. विशेषतः राजधानी दिल्लीत ज्ञानाची पाणपोई बांधून बसलेल्या शिक्षणाधिकाऱ्यांना अज्ञानात किती आनंद वाटत असेल याची मराठी शाळेत शिकलेल्या माझ्यासारख्या मंडळींना कल्पना येणे खरोखरीच कठीण आहे. उदाहरणार्थ, येथल्या शाळेत लावलेल्या एका क्रमिक पुस्तकात चीनबद्दल पुढील माहिती आहे– "चिनी लोक बहुतेक नेहमी रेशमी कपडे वापरतात. धार्मिक बाबतीत ते फार उदारमतवादी आहेत, व सर्व धर्मांचा आदर करतात. बहुतेक चिनी लोक कन्फ्यूशियस, संत ताओ किंवा बुद्धाचे अनुयायी आहेत." आता बोला ! रिप व्हॅन विंकल म्हणे वीस वर्षांनी का होईना, जागा झाला. पण आमच्या या क्रमिक रिप व्हॅन विंकलची वामकुक्षी एवढ्या थोड्या वेळात आटपणे शक्य नाही. भारत स्वतंत्र होऊन एकवीस वर्षे झाली अन् चीन साम्यवादी होऊन एकोणीस वर्षे झाली. पण म्हणून काय झाले ? कालो ह्ययं निरवधिः, नाही का ? शिवाय शिष्टाचाराचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कन्फ्यूशियशला आजचे चिनी किती मानतात याचा चक्षुर्वै सत्यम् पुरावा पेकिंगमधली उद्ध्वस्त वकिलात देऊ शकेल. आणि चिनी लोक अजूनही बुद्धाचे अनुयायी आहेत यात काय संशय ? बुद्धाची अहिंसा आपल्या रोमरोमांत किती भिनली आहे हे भारतीय भाई–माईंना आवर्जून सांगण्यासाठीच तर ते बासष्ट साली एवढा हिमालय चढून आपल्या दाराशी आले होते. आणि संत ताओबद्दल सांगायचे म्हणजे ताओ अन् माओ जवळ जवळ एकच नाही का ? आपल्याकडे प्राचीन वाङ्मयात नेहमी सापडणाऱ्या पाठभेदाचाच हा चिनी प्रकार म्हणायला हरकत नाही. चिनी लोक इतर धर्ममतांचा किती नितांत आदर करतात याची साक्ष चिनी बंदुकीच्या गोळीने धम्मपदाला पाठविलेला प्रत्येक तिबेटी लामा देऊ शकेल. वास्तविक हा उदारपणा उतू जाऊन राजकीय व इतर क्षेत्रांतही पसरला आहे. खोटे वाटत असेल तर चीनमधील भारतीय वकिलातीतला एके काळी गाजलेला अधिकारी रघुनाथ यालाच विचारा.

○

# ए का

## अनुवाद

संध्याकाळ झाली होती. दक्षिण पॅसिफिक महासागराच्या पाण्यात एक रबरी तराफा हेलकावे खात होता. तराफ्यातील तीन अमेरिकन सैनिकांच्या आयुष्यातील तो दुर्दिन होता. दुपारी अडीच वाजता, गस्त घालण्यासाठी ' एंटर प्राईज ' नावाच्या विमानवाहू बोटीवरून निघालेले त्यांचे डिव्हॅस्टॅटर जातीचे टॉर्पेडो बॉम्बर संध्याकाळी, गॅस संपून समुद्रात कोसळले होते. विमानातून कसेतरी बाहेर पडून त्यांनी रबरी तराफ्याचा आश्रय घेतला होता.

ते तिघेजण होते : बावीस वर्षे हवाईदलात असलेला हॅरॉल्ड एफ्. डिक्सन त्यांचा प्रमुख होता. उरलेले दोघे तरुण होते. बॉम्बफेक्या टोनी पॅस्तुला होता चोवीस वर्षांचा आणि रेडिओमन जेनी ॲल्ड्रिच बावीस वर्षांचा. तरुण असले तरी आपल्या सेनादलाचा अभिमान त्यांच्या नसानसात भरलेला होता. दैव आपल्याविरुद्ध आहे, हे त्यांना उमगले. परंतु दैवाशी निर्धाराने झुंज घेण्याचा निर्णय त्यांनी नकळत घेतला होता.

" आपली परिस्थिती अगदीच काही वाईट नाही. " डिक्सन म्हणाला, " आपल्या सभोवार सगळी बेटं पसरली आहेत, आणि लवकरच एखाद्या बेटावर पोहोचू आपण. प्रश्न एवढाच आहे की आपण नेमके योग्य बेटावर कसे पोहोचणार ? "

" म्हणज काय ? " जेनी ॲल्ड्रिचने विचारले, " मला वाटतं ही सगळी बेटं एकसारखीच आहेत. "

" छे छे आता त्यांपैकी काही जपान्यांच्या ताब्यात आहेत आणि जपान्यांनी नेमकी कुठली बेटं काबीज केली आहेत ते दुर्दैवानं आपल्याला माहीत नाही. "

१९४२ सालातील जानेवारी महिना होता तो. नुकताच जपानने अनपेक्षितपणे पर्ल बंदरावर हल्ला चढवून बंदरात असलेले अमेरिकेचे अर्धेअधिक आरमार बुडविले होते. आणि त्यानंतर पॅसिफिक महासागरातील बेटांचे समुदाय एकामागून एक काबीज केले होते. यांपैकी एखाद्या बेटावर जाऊन पोहोचलो तर काय होईल, याचा विचार करायला डिक्सन तयार नव्हता.

तो तराफा रबरी होता. फार हलका होता आणि शिडे वा सुकाणू कसलीच व्यवस्था त्यात नव्हती. आठ फूट × चार फूट लांबीरुंदीच्या त्या तराफ्यात एका वेळी तिघांना झोपणेही अवघड होते. तराफ्यात असलेल्या हत्यारांच्या पिशवीत एक शिटी, एक पकड आणि रबराला ठिगळ लावताना उपयोगात येणाऱ्या एक प्रका-

# नाविक साहसाची कथा

अनंत भावे

ऱ्च्या सीमेंटचा एक डबा एवढयाच गोष्टी होत्या. पॅस्तूलाने एक पिस्तुल वाचवले होते आणि ॲल्ड्रिचकडे एक सुरी होती. खाणेपिणे त्यांच्याजवळ काहीच नव्हते आणि विमान पडले तेव्हा त्यांची घडयाळेही बंद पडली होती !

त्यांनी आळीपाळीने पहारा करायचे ठरवले. पहिल्या रात्री तिघांनाही फार थोडी झोप मिळाली. समुद्र शांत होता आणि डोक्यावर आकाशात तारे चमकत होते. सकाळी त्यांच्या शोधाचे प्रयत्न कसे चालतील, याविषयी त्यांची चर्चा चालली होती.

" पाण्याशिवाय आपण किती दिवस राहू शकू ?" मध्येच पॅस्तूलाने डिक्सनला विचारले.

" तुला वाटतं त्यापेक्षा निश्चित जास्त दिवस काढू शकू आपण." शहाण्या डिक्सनने उत्तर दिले. " शिवाय आपण डोल्ड्रम्सच्या (विषुववृत्तालगतच्या) प्रदेशात आहो; या प्रदेशात पाऊस सारखा पडतो. मला वाटतं, पाण्याची मोठी अडचण वाटणार नाही आपल्याला."

सकाळ झाली. थोडयाच वेळात त्यांना उंच आकाशात एक विमान दिसले. विमान पश्चिमेकडे, त्यांचे जहाज होते त्याच दिशेकडे चालले होते. डिक्सनला वाटले, आपले होते तसले डिव्हॅस्टॅटर जातीचेच विमान आहे ते. आपल्या पथकातीलच असेल कदाचित. पॅस्तुलाने एका लहानशा आरशाच्या साहाय्याने कवडसा पाडून इशारा देण्याचा यत्न केला. परंतु विमान तसेच पुढे गेले.

त्या पहिल्या दिवशीच पुढील प्रवासाची निश्चित कल्पना त्यांना आली. विषुववृत्तावरचा सूर्य त्यांना भाजून काढीत होता. अंगातील शर्टस् काढून डोक्याला बांधले तेव्हा जरा बरे वाटले. त्याशिवाय ते समुद्रात पुन्हा पुन्हा बुडया मारीत असत. दिवस वर आल्यावर तहानेने जीव कासावीस झाला.

त्यांच्या तराफ्याच्या पिवळट–तांबडया रंगामुळे समुद्रातले मासे त्याजवळ येत. पण त्यांना मारण्यासारखे हत्यार त्यांच्यापाशी नव्हते.

तराफा ठराविक दिशेने निश्चित वाहावा, यासाठी डिक्सनचे प्रयत्न चालले होते. थोडया वेळाने त्याच्या लक्षात आले की, तराफ्याच्या फुगवलेल्या मोठ्या बाजू शिडांसारखेच काम देत होत्या आणि वेगवान वाऱ्यावर तराफा जलद गतीने चालण्याची शक्यता बरीच होती.

तराफ्याच्या एका बाजूचा उपयोग डिक्सनने नोंदवहीसारखा करायला सुरुवात केली. दिवसातील प्रवासाची नोंद त्यावर ठेवण्यात आली. तराफ्यात असलेल्या छोट्या संरक्षणपट्ट्यावर भोवतालच्या प्रदेशाचा नकाशाही काढायला त्याने सुरुवात केली.

पाच दिवस झाले. या पाच दिवसांत त्यांना काही खायला मिळाले नाही. प्यायला पाणीही मिळाले नाही. सूर्य त्यांना भाजून काढीतच होता.

त्या रात्री मात्र पाऊस पडला. चिरफाळलेल्या ओठांनी ते पावसाचे भरपूर पाणी प्याले. तराफ्याच्या एका बाजूला असलेल्या रबरी कप्प्यात पावसाचे पाणी साठवण्यात आले, पाऊस थांबला तेव्हा दोन दिवसांपुरते पाणी त्या कप्प्यात जमले.

तराफ्याभोवती त्यांना मासे दिसत असत; पण अजूनपर्यंत त्यांच्या तोंडी काहीच पडले नव्हते. शेवटी जेनी ॲल्ड्रिचने आपल्या जवळच्या सुरीने मासे मारायचे ठरवले. आणि दीर्घकाळच्या सावधानतेनंतर त्याने एक पंधरा इंच लांबीचा मासा मारला. त्या माशावर ते अगदी तुटून पडले. त्याच दिवशी त्यांनी एक समुद्रपक्षीही मारला.

आठ दिवसांच्या तसल्या प्रवासानंतर त्यांचे चेहेरे विलक्षण झाले होते. उन्हामुळे त्यांची शरीरे चिरफाळली होती. डोळ्यांची आत्यंतिक आग होत होती. फार फार थकवा आला होता, तरी ते नाउमेद नव्हते. डिक्सनला तर आता फारच उत्साह वाटत होता.

## शार्कची शिकार

आता समुद्रात शार्क मासे दिसू लागले. त्यामुळे पोहणे बंद झाले. जेनीने एके दिवशी कहरच केला. आपल्या सुरीने त्याने चार फुटांचा एक शार्क मासा जखमी केला व तराफ्यात ओढला. त्याच्या धारदार दातांमुळे रबरी तराफा फाटण्याची भीती होती. पण तिघांनी त्या शार्कचा पुरता बंदोबस्त केला. शार्कच्या पोटात त्याने गिळलेले आणखी दोन मासे त्यांना मिळाले. शार्कच्या शिकारीमुळे त्यांची आशा उजळली.

तराफा आग्नेय दिशेने हळूहळू वाहत होता. शिडे आणि सुकाणू नसतानादेखील कधी कधी दिवसात चाळीस मैल तो जाई. तराफ्याचा वेग कसा वाढेल आणि त्याची दिशाही निश्चित कशी होईल याचा विचार करताना डिक्सनला एक कल्पना सुचली. बुटांच्या तळांचा उपयोग वल्ह्यांसारखा करण्याचा त्याने प्रयत्न केला; आणि तो चांगलाच यशस्वी झाला.

दिवसामागून दिवस चालले होते. सततच्या सहवासामुळे त्या तिघांत थोडी कुरबुर सुरू झाली होती. पण डिक्सनच्या शहाणपणामुळे प्रकरण विकोपाला गेले नाही.

नंतर तीन दिवस वादळ झाले. समुद्र खवळला. पर्वतप्राय लाटांच्या तडाख्यात

तो चिमुकला तराफा सापडला. पाणी आत येऊ लागले; आणि ते बाहेर काढण्याची दुसरी कोणतीच साधने त्यांच्यापाशी नसल्याने त्यांना ते हातानीच उपसावे लागले. या संकटातून ते सहीसलामत सुटले. त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते एक-मेकांच्या अधिक जवळ आले.

हा विजय साजरा करण्याकरिताच जणू कोठून तरी एक पक्षी आला आणि डिक्सनच्या डोक्यावर बसला. हळूच हात वर करून त्याने तो पकडला, आणि त्या तिघांनी त्याच्यावर यथेच्छ ताव मारला.

दुसऱ्या दिवशी एक वाहता ओंडका त्यांनी पकडला त्या ओंडक्याला चिकटून असलेली कालवे आणि काही खेकडे त्यांना मिळाले. वाहत आलेला एक नारळ-सुद्धा त्यांना मिळाला. एकूण त्यांचे बरे चालले होते !

पंचविसाव्या दिवशी पुन्हा एकदा प्रचंड वादळ झाले आणि या वादळाने जणू त्यांना गिळंकृत करण्याचा चंगच बांधला होता. एका महाकाय लाटेने त्यांचा तराफा एखाद्या चेंडूसारखा दूर उडाला. तराफ्यातील हे तीन प्रवासी दूर फेकले गेले. बऱ्याच प्रयासानंतर पुन्हा त्यांनी तराफा सुलटा करून त्यात आश्रय घेतला. या भयानक संकटातून मुक्त झाल्यामुळे त्यांची अंतःकरणे उत्साहाने ओसंडू लागली. समुद्राचे वितुष्ट आता संपणार, आता आपण विजयी होणार असे त्यांना मनोमन वाटू लागले.

असा चौतीस दिवस प्रवास चालला, चौतिसाव्या दिवशी सकाळी पहाऱ्यावर असलेल्या जेनी ॲल्ड्रिचला पुन्हा एकदा जमीन दिसली. !

एकोणीस फेब्रुवारी एकोणीसशे बेचाळीस रोजी चौतीस दिवसांच्या विलक्षण प्रवासानंतर ते पुकापुका बेटाच्या किनाऱ्याला लागले. सुदैवाने ते बेट दोस्तांच्याच ताब्यात होते. जवळजवळ बाराशे मैलांचा प्रवास करून ते येथवर आले होते.

डिक्सनच्या या अद्भुत साहसाबद्दल त्याला 'नेव्ही क्रॉस' बहाल करण्यात आला. असामान्य शौर्य, अजोड निर्धार, प्रसंगावधान, कुशल नौकानयन, कठिण निर्णय घेण्याची क्षमता, प्रथम दर्जाचे नेतृत्व या त्याच्या गुणांचा खास गौरवोल्लेख वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केला.

ॲल्ड्रिच व पॅस्तुला यांनाही पदके मिळाली ! ○

[ हॅरॉल्ड वॉटर्स यांच्या कथेचा स्वैर अनुवाद ]



# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

जुलै २० ते २६ राशि-भविष्य

**मेष :** सूर्य–मंगळ चतुर्थस्थानी आले आहेत, येत आहेत. त्यांची झळ फारशी बाधेल असे नाही, पण तुमच्या कर्तृत्वाचे क्षेत्र अकुंचित बनू लागेल. सहज–सुलभ यश मिळणे कठीणच. प्रत्येक गोष्टीसाठी अगदी जिवाचे रान करावे लागेल.

कामाचा ताण खूपच वाढेल, मानसिक शांतता भंगेल, सहकाऱ्यांची मने कलुषित बनू लागतील, कित्येक वेळा प्रकृतीही बिघडेल. जुलैचा अखेरचा आठवडा काहीसा जपून काढलात की, पुढे फारसा त्रास अनुभवावा लागणार नाही.

नोकरीधंद्यात प्रगतीची संधी हुकेल, प्रतिमा काळवंडेल, प्रज्ञा बोथट बनेल. तज्ज्ञांचे सहाय्य घेतल्याशिवाय पुढे पाऊल टाकणे इष्ट ठरणार नाही.

दि. २२–२३–२६ थोडेफार अनुकूल दिवस.

**वृषभ :** सध्या आपल्या पराक्रमस्थानी इतके समर्थ ग्रह आलेले आहेत की, आता माघार नाही, कचखाऊ मनोवृत्ती नाही. पुढे, सतत पुढे असेच त्यांचे आवर्जून सांगणे आहे. तुम्हाला साडेसाती सुरू झाली आहे म्हणतात, पण सध्याच्या ग्रहस्थितीकडे पाहून तुम्हाला हे म्हणणे मुळीच खरे वाटणार नाही.

आजवरच्या साऱ्या अनिष्टतेला छेद देणारी ग्रहरचना कित्येक दिवसांनंतर आताच आपल्या वाट्यास आलेली आहे, तिचा पुरेपूर फायदा उठवलात तर हवं तें मिळवू शकाल.

नोकरीत बदली–बढतीचे योग दिसू लागतील. व्यवसायक्षेत्राचा व्याप–विस्तार वाढू लागेल. स्थावराचा प्रश्न मिटल, वाहनांची समस्या सुटेल.

दि. २२–२४–२६ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :** सारे उपद्रव्यापी ग्रह तुमच्या राशीतून पसार झाले. आता तुम्हांला कुणाचीही डर नाही. तृतीयातील गुरूवर आणि एकादशस्थानी आलेल्या शनीवर तुमची सारी मदार आहे. ते तुमचा अपेक्षाभंग करणार नाहीत, असं त्यांच्या आजवरच्या चारित्र्यावरून उघड दिसते.

तुमचा जो जो व्यवसाय असेल त्यात तुम्ही हळूहळू प्रगतीकडे वाटचाल करू लागाल. प्रत्यक्ष सांपत्तिक लाभ फारसा झाला नाही तरी भविष्यकाली घडून येणाऱ्या अनेक भव्यदिव्य घटना आताच अंकुरायला लागतील.

प्रगतीची नवी क्षेत्रे दृष्टिक्षेपात यायला लागतील. कला, काव्य, चित्रपट, कथालेखन या बाबतींत तुमची प्रतिमा बहरू लागेल.

नव्या आकर्षक योजना समाजापुढे मांडल्या जातील.

दि. २३ ते २६ हेच दिवस प्रगतीला पोषक ठरतील.

**कर्क :** अजूनही काही काळ आपणांस धीराने घ्यावे लागेल. कोणत्याही कामातला आततायीपणा अंगाशी आल्याखेरीज राहणार नाही. या आठवड्याच्या अखेरीस मंगळाचे तुमच्या राशीतून संचलन घडू लागेल आणि मग त्याचे परिणाम तुम्हांला जाणवल्याशिवाय कसे राहतील ?

काही दिवस उद्योगधंद्याचे जुने तंत्र बदलून पाहा. विचारवंतांचे हरघडी सहाय्य घेऊन पाहा—थोडीफार आशादायक स्थिती जाणवू लागावी

मुख्यत: या वेळी अनावश्यक खर्चाला पायबंद घाला. वरिष्ठांची नाराजी वाढवून घेऊ नका, आणि राजकीय क्षेत्रातील फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलण्याच्या फंदात पडू नका.

दि. २४ ते २६ थोडेफार अनुकूल दिवस

**सिंह :** व्ययस्थानी आलेल्या आणि येणाऱ्या अनिष्ट ग्रहांमुळे, आजवरचे तुमचे निष्कलंक चारित्र्य थोडेफार डागळल्या सारखे होईल. पण तेवढ्याने काही तुमच्या प्रतिष्ठेवर परिणाम घडणार नाही. सहजासहजी कोणती गोष्ट घडेल असे मात्र नाही.

खर्च अवाढव्य वाढेल, प्राप्तीचे मानही पूर्वीसारखे राहणार नाही, व्यापारधंद्यातील आडाखे फसतील आणि विरोधकही मधूनमधून डोके वर काढतील. अशा वेळी


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

काहीसे चातुर्याने, धोरणाने वागायला हवे.

नोकरीधंद्यात वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी पटेनासे होईल. ज्या हेतूने प्रवास कराल तो हेतू सफल होण्याची शक्यता कमी. फसवणूक, विश्वासघात असलेही प्रकार केव्हा केव्हा घडू लागतील.

दि. २२ तें २५ अल्पसे यश याच काली मिळेल.

**कन्या :** कित्येक महिन्यांनंतर सूर्य–शुक्र तुमच्या लाभस्थानी आलेले आहेत. मंगळ–बुधही तिकडेच यायला निघालेले आहेत.

गेल्या १५–२० दिवसांत शिकस्तीचे प्रयत्न करूनही जी कामे घडली नाहीत ती आता विनासायास घडून येऊ लागतील. हुकलेल्या संधी पुन्हा लाभतील, घसरलेला धंदा जोमाने उभा राहील, अनेक धनिकांचे सक्रीय सहाय्य लाभेल. धनोत्पादनाचे नवेनवे अनेक मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील.

आगामी ८–१५ दिवस आपणांस आपल्या व्यवसायधंद्यात इतके चांगले जाणवतील की, तुमच्या प्रगतीचा अनेकांनी हेवा करावा.

दि. २०–२२–२४ हे दिवस फारच घाईगर्दीत जातील.

**तूळ :** गेल्या महिन्यापासून तुमची प्रगतीकडे घोडदौड सुरूच आहे. या वेळी तिची गती आणखीन वाढेल. मंगळ दशमात येताच तुमचा तुमच्या कार्यक्षेत्रात आवाज उठू लागेल.

मुख्यत: कलाक्षेत्रात–साहित्याच्या प्रांतात तुमचे कतृत्व अधिक धारदार बनेल. पैसा–प्रतिष्ठा अमाप लाभेल.

स्थावराची समस्या सुटेल. वाहनाची विवंचना मिटेल, उच्च अधिकाऱ्यापुढे मुलाखती झडू लागतील, प्रगतीच्या साऱ्या वाटा निर्वेध–निष्कंटक बनू लागतील. तात्पर्य, या काळात आपण जे जे कराल ते ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल.

दि. २२ ते २६ सर्वोत्तम प्रगतीचा काळ.

**वृश्चिक :** आपल्या भाग्यस्थानी सूर्य–शुक्र आलेलेच आहेत–मंगळही लवकरच येणार आहे. आता तुम्हांला कुणाचीही डर नाही. गेल्या कित्येक महिन्यांतील पेचप्रसंग भराभर सुटायला लागतील. उद्योगधंद्यात प्रगतीचा वेग वाढेल, अपेक्षेप्रमाणे सारे काही घडून यायला लागेल.

यांत्रिक–वैद्यकीय क्षेत्रात आपला कोणीही हात धरू शकणार नाही. अनपेक्षित लाभ याच वेळी घडून यावेत.

मंगलकार्याचे ठरेल, काही व्यक्तींना परदेशी जाण्याचीही संधी लाभेल. आरोग्य ठणठणीत बनेल.

दि. २४ ते २६ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**धनु :** गल्या आठवड्यात व आताही अनेक ग्रहांची राश्यंतरे घडलेली आहेत–घडत आहेत. पण त्यामुळे तुमच्या परिस्थितीत काही फरक पडेल असे दिसत नाही.

पूर्वीच्याच अडचणी–कटकटी वेगळया रूपात अनुभवाव्या लागतील. मुख्यत: आरोग्य आणि पैसा यावरच त्यांचा आघात करण्याचा विचार दिसतोय.

या १५–२० दिवसांत न पेलण्यासारख्या जबाबदाऱ्या उचलू नका. क्षुल्लकशा कारणांवरून हातघाईवर येऊ नका. नोकरीधंद्यात बदल घडवून आणण्याचे विचार डोक्यात आणू नका. व सामाजिक राजकीय क्षेत्रापासून सध्यातरी चार हात दूरच रहा.

दि. २२ ते २४ थोडेफार यश याच वेळी मिळावे.

**मकर :** या काळापासून आपणांस नको त्या प्रसंगाना तोंड द्यावे लागेल. घरी-दारी वादविवाद–संघर्ष यांना ऊत येईल, भागीदार कोणत्याही क्षणी बिथरतील. वरिष्ठांची नाराजी पत्करावी लागेल. सप्तमस्थानी जमलेल्या आणि जमणाऱ्या अनेक उग्रहांचीच ही कारस्थाने.

या वेळी अंतरिक्षातील एकाही ग्रहाची आपणास सहानुभूती नाही.

अशा आणिबाणीच्या वेळीच तुमच्यातील निर्धार पेटून उठेल. जिद्द जागी होईल आजवर असे अनेक प्रसंग आपणांवर आले आणि ते सारे आपण पचवूनही टाकले. या वेळीही आपल्यातील निर्धार आपणांस उपयोगी पडेल. दूरच्या प्रवासाचे प्रकर्षाने टाळा.

दि. २० ते २३ थोडेफार अनुकूल दिवस.

**कुंभ :** मध्यंतरीचा काळ आपणांस अनुकूलच होता–आता या आठवड्यापासून अधिक अनुकूल जाणवायला लागेल. षष्ठस्थानी रवि–मंगळासारखे ग्रह आले, की ते अचाट कार्य करवून आणू शकतात असे म्हणतात–आपणांसही या वेळी तसा प्रत्यय यावा.

आपल्या मनावरील नैराश्याची जळमटे झटकली जातील. आपल्या सुप्त गुणांना वाव मिळेल असे वातावरण निर्माण होईल. घरचे आणि व्यवसायधंद्यातील गढूळ वातावरण निवळू लागेल. आता तुम्हांला सहसा कोणत्याही गोष्टीबद्दल चिंता करण्याचा प्रसंगच येणार नाही.

दि. २३–२५–२६ अपेक्षासाफल्याचा काळ.


**मीन :** चौथ्या मंगळाची डोकेदुखी आता थांबल्यासारखीच आहे. २६ जुलैला मंगळ तेथून पसार झाला की, ती कटकट कायमची मिटून जाईल.

नजीकच्या काळात आपल्या आजवरच्या असफल आशा-आकांक्षा बऱ्याच प्रमाणावर सफल व्हाव्यात. नव्या आशा अंकुरायला लागतील, प्रगतीच्या नव्या वाटांकडे पावले पडू लागतील.

कौटुंबिक अनारोग्य, सांपत्तिक विवंचना, इष्टमित्रांची निर्माण झालेली कटुता हे सारे सारे प्रकार नाहीसे होऊन सर्वत्र प्रसन्न वातावरण दिसू लागेल. सध्याचे ७–८ दिवस काहीसे जपून काढलेत की, तुमच्या अनिष्टतेवर कायमचा पडदा पडेल.

दि. २४ ते २६ येथूनच प्रसन्नता अनुभवण्यास मिळेल. ○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649



# माणूस

* *

# ऋणमुक्तता विशेषांक

* *

प्रसिद्धी : १५ ऑगस्ट १९६८

* *

तपशील पुढील अंकी

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.